07-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

KBS/ 13:00

12-07-2005 " (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

KBS/KGS/MAP. 13:00

सभापतीस्थानी - माननीय सभापती

नियम 289 खाली दिलेल्या प्रस्तावाच्या सुचनेबाबत..

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय सभापती महोदय, आजही आम्ही आपल्याकडे नियम 289 खाली एक प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. काल दिवसभर आम्ही या विषयाची मागणी करीत होतो की, राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बोनसच्या पहिल्या हप्त्याचे पैसे अजूनही मिळालेले नाहीत. जवळपास ते साडेपाचशे कोटी रुपये शासनाकडून शेतकऱ्यांना येणे बाकी आहे आणि शिवाय दुसऱ्या हप्त्याचेही पैसे देणे बाकी आहेत. महाराष्ट्रामध्ये अवर्षण प्रवण परिस्थिती निर्माण झालेली असताना शेतकऱ्यांना बी-बियाणांसाठी पैसे नाहीत अशा वेळेस पणन महासंघाच्या माध्यमातून खरेदी केलेल्या त्यांच्या कापसाचे पैसे वारंवार मागणी करूनही, शासनाने त्याबाबत शेतकऱ्यांना आश्वासन देऊनही, शेतकऱ्यांना त्यांचे पैसे मिळालेले नाहीत. सभापती महोदय, या सदनामध्ये आणि बाहेरही शासनाने याबाबतीत आश्वासने दिलेली आहेत. जून महिन्यामध्ये पहिला हप्ता आणि दिवाळीमध्ये दुसरा हप्ता अशा प्रकारे शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाचे पैसे दिले जातील असे सांगण्यात आले होते. आज जुलै महिना सुरू झालेला आहे, जुलै महिन्याची 12 तारीख आज आहे पण अजूनही शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाच्या खरेदीचे पहिल्या हप्त्याचे पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण पुन्हा या राज्यात वाढत आहे. म्हणून या सभागृहाचे आजचे कामकाज थोडेसे बाजूला सारून या विषयावर चर्चा झाली पाहिजे अशी मी पुन्हा एकदा आग्रहाने विनंतीपूर्वक आपल्याकडे मागणी करतो, तिचा आपण स्वीकार करावा.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदय, या विषयावर काल आम्ही या सदनामध्ये थोडी चर्चा केली. सन्माननीय पणन मंत्री या बाबतीत काही तरी उत्तर देत होते. पण ते कोणाच्या समाधानासाठी हे काही मला माहीत नाही. मात्र ते बोलत होते, ते काय बोलले याचीही आम्हाला कल्पना नाही. विषय मात्र आहे तेथेच आहे. पैसे दिले म्हणून त्यांनी सांगितले, 80 कोटीची तरतूद केली असेही ते म्हणाले. सभापती महोदय, सदनामध्ये अशा प्रकारे निवेदन करताना शासन एक प्रकारे शेतकऱ्यांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा धंदा करीत असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे आपण या विषयाला अग्रक्रम देऊन यावर सदनामध्ये चर्चा करावी, अन्यथा आपण माननीय पणन मंत्र्यांना येथे बोलावून घेऊन समज द्यावी. ज्या घोषणा त्यांनी येथे आणि बाहेरही केल्या आहेत त्याची त्यांनी प्रथम अमलबजावणी करावी. अन्यथा ती घोषणाबाजी थांबवावी. नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ....

तर हे सरकार केवळ घोषणा देणारे सरकार आहे असा संदेश महाराष्ट्रात जाईल ते उचित होणार नाही. तेव्हा आपण मंत्री महोदयांना बोलावून घेऊन स्पष्टपणे याबाबत निवेदन करण्यास, लेखी स्वरूपात निवेदन करण्यास सांगावे, त्यासाठी नियम 289 चा जो प्रस्ताव आम्ही दिला आहे तो मान्य करून चर्चा घडवून आणावी अशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी सूचना दिली आहे तिला मी पाठिंबा देतो.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, माझा या ठिकाणी गंभीर असा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये काल आम्ही कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाचे पैसे शासनाने जून महिन्यात पहिला हप्ता देऊ असे आश्वासन देऊन, घोषित करूनही, अजूनपर्यंत दिलेले नाहीत याबाबत अग्रक्रमाने चर्चा घ्यावी म्हणून प्रस्ताव दिला होता. आपणही शेतकऱ्यांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चा व्हावी म्हणून आम्हाला समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याबाबतीत सदनामध्ये चर्चा झाली का ? नाही. चर्चेला उत्तर देण्याचा प्रयत्न झाला का ? नाही. असे असतानाही, हे सभागृह चालू असताना, अधिवेशन सुरू झालेले असताना, बाहेर मिडियासमोर मात्र मंत्री महोदय जाऊन सांगतात की, शेतकऱ्यांचे पैसे आम्ही दिलेले आहेत, त्यासाठी 547 कोटीची तरतूद केलेली आहे, वगैरे. हे सारे आम्हाला बाहेर वर्तमानपत्रातून समजते आहे. जे मंत्र्यांनी अधिवेशन चालू असतानाच्या काळामध्ये सभागृहामध्ये सांगण्याची आवश्यकता आहे, ते न सांगता, आम्हाला ते वर्तमानपत्रातून वाचावयास मिळते. ही सभागृहाच्या दृष्टीने अवमानकारक बाब आहे. तेव्हा आपण आम्हाला मार्गदर्शन करावे की, अशा प्रकारे विधीमंडळाचे अधिवेशन सुरू असताना, सभागृह चालू असताना येथे संबंधित विषयावर चर्चा टाळून मंत्र्यांनी बाहेर निवेदन द्यावे काय ? ही चर्चा येथे झाली तर हे सरकार पुन्हा एकदा आल्यापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या वाढत चालली आहे. अशा वेळी सदनाची बैठक चालू असताना मंत्र्यांनी बाहेर घोषणा करणे ही सभागृहाचा अवमान करणारी बाब आहे. ....

(यानंतर श्री. जागडे ..... बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण पणनमंत्र्यांना सभागृहात बोलावून त्यांचा खुलासा मागितला पाहिजे. अधिवेशन चालू असताना माननीय पणनमंत्र्यांनी सभागृहाबाहेर मिडियासमोर स्टेटमेंट केले आहे. खरे म्हणजे माननीय पणनमंत्र्यांनी सभागृहाचा अवमान केलेला आहे. म्हणून माननीय पणनमंत्र्यांना सभागृहात बोलावून त्यांचा खुलासा घेतला पाहिजे. मी माननीय सभापती महोदयांना पुन्हा विनंती करतो की, सभागृहासमोरील कामकाज त्वरीत थांबवून मी दिलेल्या नियम 289 च्या प्रस्तावावर चर्चा सुरु करावी. तसेच माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्यावर निर्णय द्यावा.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, काल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी मागणी केली होती, त्या मागणीला माननीय पणनमंत्री उत्तर देत होते. मी जे त्यावेळी ऐकले ते असे आहे की, " आठ ते दहा दिवसात कापूस उत्पादक शेतक-यांना द्यावयाच्या पैशाची व्यवस्था केली जाईल. " असे माननीय पणनमंत्र्यांनी सांगितले होते. परंतु त्यावेळी सभागृहात गोंधळ सुरु असल्यामुळे माननीय सदस्यांना ते ऐकू आले नसावे. मी माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे ऐकले आहे. तेव्हा पणनमंत्र्यांना सभागृहाचा अवमान केला आहे असे होत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय सदस्य या बाबतचा खुलासा का करीत आहेत ? माननीय पणनमंत्र्यांनी सभागृहात येऊन त्या बाबतचा खुलासा केला पाहिजे.

सभापती : काल दि. 11.7.2005 रोजी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये एक प्रस्ताव दिला होता. त्यावर मी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना बोलण्यास संधी दिली होती. मी त्यावेळी असेही सांगितले होते की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण नियम 97 अन्वये या विषयावर चर्चा करावी. तशी चर्चा द्यावयाला मी तयार आहे. म्हणून माझे रुलींग काल माननीय सदस्यांना पटले नाही. त्यानंतर सदनात गडबड सुरु झाली. दरम्यानच्या काळात संसदीय कार्यमंत्र्यांनी माझ्याकडे बोलण्यास परवानगी मागितली आणि मी त्यांना ती परवानगी दिली. ही वस्तुस्थिती आहे. त्यावेळी माननीय पणनमंत्री आणि संसदीय कार्यमंत्र्यांनी जे वक्तव्य केले, ते वक्तव्य गडबड असल्यामुळे माननीय सदस्यांनी ऐकू आले नसेल. मी परवानगी दिल्यानंतरच माननीय पणनमंत्र्यांनी यावर भाष्य केले आहे. त्यामुळे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतें यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे, तो हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही. माननीय संसदीय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

कार्यमंत्री तसेच पणनमंत्र्यांनी माझ्याकडे परवानगी मागितली होती आणि त्यांना मी बोलण्यास परवानगी दिली होती. तेव्हा हा विषय हा संपला आहे. आता आपण प्रश्नोत्तरे सुरु करु. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कापूस, आंबा आणि धान या पिकाबाबत जो 289 चा प्रस्ताव दिला आहे, त्या बाबत मी माननीय पणनमंत्र्यांना स्टेटमेंट करावयाला सांगतो. माननीय मंत्रीमहोदय श्री. गणेश नाईक या बाबतची नोंद घेऊन ते पणनमंत्र्यांना स्टेटमेंट करण्यास सांगतील. त्याप्रमाणे पणनमंत्री या बाबतचे निवेदन दिवसभरात करतील.

-

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्नोत्तरे

तोंडी उत्तरे

वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राहय धरण्याबाबत

(१) * ५५८४ श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर , डॉ. अशोक मोडक , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. वसंतराव चव्हाण , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जगन्नाथ शेवाळे , प्रा. फौजीया खान , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. नतिकोद्दीन खतिब तारांकित प्रश्न क्रमांक १७६१ ला दिनांक १७ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाहय आहे असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी एका याचिकेमध्ये (सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६) दिला त्याची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याबाबत कॅबिनेट समोर नेऊन एक महिन्याच्या आत त्या संबंधी निर्णय घेण्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापही विचार पूर्ण झालेला नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता : (१) होय.

(२) शाळा अनुदानावर आलेल्या वर्षापासून पुढील सेवा वरिष्ठश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नॉर्मली प्रश्नोत्तराच्या तासात आपण हरकतीचा मुद्दा उपस्थित करीत नाही. परंतु या ठिकाणी वस्तुस्थिती वेगळी असल्यामुळे मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. आता माझ्या हरकतीच्या मुद्दावर माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे, अशी माझी अपेक्षा नाही. उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर तसेच तेथील कामकाजावर आपणाला सभागृहात चर्चा करता येत नाही. मुंबई उच्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5584....

श्री. बी. टी. देशमुख.....

न्यायालयाने दि. 14.9.2000 रोजी या बाबतचा धोरणात्मक निर्णय दिला आहे. त्या निर्णयाबाबत या प्रश्नामध्ये माननीय सदस्यांनी तसा उल्लेख केला आहे. म्हणून आम्हाला याची माहिती नाही, असे माननीय मंत्रिमहोदय म्हणू शकत नाही. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या परिच्छेद 6 मध्ये असे म्हटले आहे की,

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5584...

प्रा. बी. टी. देशमुख...

"It may be mentioned at this stage that the government resolution dated 2-9-89 nowhere mentions that the qualified service of 12 years should be from the school which is brought on grant basis. It is required to be noted that the qualification prescribed for the aided school are same in the unaided school and there are no separate rules for unaided school which receiving grant and school which is not receiving grant. Under the circumstances it is not correct to assume that 12 years service should be from aided school only." यानंतर सभागृहामध्ये या प्रश्नाला शासनाने उत्तर दिले की, हा निर्णय धोरणात्मक आहे. मी मुद्दाम आपल्या लक्षात आणतो की, शुक्रवार दिनांक 11 जून 2004 ला प्रश्न क्र. 36739 ला दिलेले उत्तर समोर आहे. प्रश्न असा आहे की, "वरिष्ठ श्रेणी वा निवड श्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही नियमबाहय आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपिठाने दिनांक 14 सप्टेंबर 2000 रोजी एका याचिकेमध्ये सन 2000 ची याचिका क्रमांक 4643 दिला आहे हे खरे आहे काय?" त्याला उत्तर "होय" दिले आहे. आता हायकोर्टाने निर्णय दिला. तो निर्णय काय आहे? तो निर्णय असा आहे की, असा भेदभाव करणे बरोबर नाही. आणि दुर्दैवाने त्या नंतर त्यांनी 15 एप्रिल 2005 ला सभागृहामध्ये एक वाक्य लक्षवेधीमध्ये वापरले होते की, या उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे याचिकाकर्त्यापुरता हा निर्णय मान्य करणे आवश्यक आहे. आता याठिकाणी विरोधातच निर्णय मांडलेला आहे. मुद्दा असा आहे की, जोपर्यंत तुम्ही एखादी गोष्ट मान्य करीत नाही तोपर्यंत ते इंटरप्रिटेंशन म्हणता येऊ शकते. परंतु तुम्ही सभागृहामध्ये एकदा ही गोष्ट मान्य केली की, हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे भेदभाव करता येत नाही. सर्वात महत्वाची गोष्ट मला या ठिकाणी सांगावयाची आहे ती अशी की, मागच्या वेळी एक मंत्रिमहोदय म्हणाले की, हायकोर्टाने दिलेला निर्णय हा फायनल थोडाच आहे. आपण सुप्रिम कोर्टामध्ये जाऊ. सभापती महोदय, आपण सभागृह तहकूब करुन हायकोर्टाच्या त्या निर्णयाची प्रत पाहून सभागृहामध्ये असे सांगितले की, "मी एवढेच सांगेन की, 2000 सालामध्ये उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यावर त्या नंतरच्या काळात अपिल झालेले नाही. त्यामुळे अपिलाची मुदत संपलेली आहे." सभापती महोदय, आता हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

एवढे ओंगळ उत्तर समोर येणे म्हणजे हायकोर्टाच्या न्यायाधिशांनी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द तर सोडा, न्यायाधिशांच्या वर्तनाविरुध्द बोललो तर ते This is not fair. देशाच्या घटनेप्रमाणे जी गोष्ट बंधनकारक आहे. अपिल करायला आम्ही कुणी नाही म्हणत नाही. त्यांनी अपिल करायला पाहिजे होते. त्यांनी अपिल केले नाही. सभागृहामध्ये आता परवा एक महिन्याच्या आत या बाबतीत पॉझिटीव्ह निर्णय घेऊ हा माझा शब्द आहे असे सांगितले. म्हणून माझा सरळ हरकतीचा मुद्दा असा की, हायकोर्टाने निर्णय दिल्या नंतर आणि सभागृहामध्ये हा धोरणात्मक निर्णय आहे हे मान्य केल्यानंतर अशाप्रकारची उत्तरे मंत्रिमहोदयांना देता येतात काय? हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. मधु चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा नाही असे ठरले आहे. तरीसुध्दा अपवादात्मक परिस्थितीमध्ये माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांना मी हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिली. याचा अर्थ अन्य माननीय सदस्यांना परवानगी आहे असा होत नाही. प्रा. बी. टी. देशमुख सरांनी याठिकाणी कायदेशीर मुद्दयांच्या अनुषंगाने विषय उपस्थित झाल्यामुळे हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात अपिल करण्यासाठी शासन वरिष्ठ कोर्टामध्ये गेले नसेल तर न्यायालयाने दिलेला निर्णय अपिलाची मुदत संपल्यानंतर शासनावर बंधनकारक असतो. अशी जर वस्तुस्थिती असेल तर त्या अनुषंगाने शासनाकडून उत्तर येणे गरजेचे आहे. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी उत्तर देतांना त्याची नोंद घ्यावी आणि उत्तर द्यावे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

ता.प्र.क्र.5584 . . . .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, 20 याचिकाकर्ते हाय कोर्टामध्ये गेले आणि त्यांच्या बाबतीत निवड श्रेणी आणि वरिष्ठ श्रेणी बाबतचा निर्णय झाला. 1986 मध्ये या शिक्षकांच्याबद्दल त्रिस्तरीय वेतनश्रेणी निश्चित केली. याचे कारण असे की, या शिक्षकांना पदोन्नती नाही. 1989 साली विना अनुदान, कायम अनुदान असे तत्व तयार केले . . . .

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे(खाली बसून) : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे . . . .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी पार्श्वभूमी सांगत आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना स्पेसीफीक उत्तर देण्यास सांगावे. हा सभागृहाचा अवमान आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी सर्व प्रश्नांची उत्तरे देणार आहे. 1989 मध्ये आपण 1986 च्या . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी ज्या सदस्यांनी मूळ प्रश्न विचारलेला आहे, त्या सन्माननीय सदस्यांना आधी प्रश्न विचारु द्यावा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझे उत्तर संपलेले नाही. मी त्या विषयाकडेच येत आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, याठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्यांनी अजून प्रश्न विचारलेलाच नाही. त्यापूर्वीच सन्माननीय सदस्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

श्री.हसन मुश्रीफ : मला माननीय सभापतींनी उत्तर देण्यास सांगितलेले आहे. . . .

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण फक्त यामध्ये त्यांना करेक्शन करावयास सांगितलेले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तेच करीत आहे. आपण मला संरक्षण द्यावे की, मी काय करु ?

सभापती : मी सांगितले त्यापध्दतीने यामध्ये काही करेक्शन असेल तर ती सांगावी.

. . . . डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5584 . . . .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी अशासाठी याची पार्श्वभूमी सांगत होतो की . . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ती सर्वांना माहिती आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, खरोखरच मी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.साहेबांच्या सर्व मुद्यांना उत्तरे देणार आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय मूळ विषय टाळून वेळ घेणारे उत्तर देत आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 20 याचिकाकर्ते हाय कोर्टामध्ये गेले. त्यांच्या बाबतीत 2000 मध्ये निर्णय झाला. गेल्या अधिवेशनामध्ये सांगितल्याप्रमाणे आम्ही मंत्रीमंडळापुढे गेलो आणि त्यांनी कॉन्शसली, सद्सद्विवेक बुध्दीला स्मरुन निर्णय घेतला. तो असा की, ...

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण त्यांना करेक्शन करावयास सांगितलेले आहे.

सभापती : माननीय मंत्री महोदय, आपण जे उत्तर देत आहात, ते शासनाचे उत्तर असून ते सद्सद्विवेक बुध्दीला स्मरुनच तयार केलेले असते आणि निर्णय घेतला जातो. त्यामुळे ते पुन्हा म्हणण्याचे काही कारण नाही.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, परवाच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये असे ठरले की, जे कोर्टामध्ये गेले त्यांना द्यावे आणि जे इतर आहेत, त्यांना देऊ नये. असा निर्णय झालेला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

प्रा.बी.टी.देशमुख (खाली बसून) : आपण कोर्टावर केवढी कृपा करीत आहात.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सभागृहामध्ये हा विषय अनेक वेळा आलेला आहे. त्यावर अनेक वेळा चर्चा झाली आहे आणि प्रत्येक वेळेस त्यांनी पॉझिटीव्ह निर्णयाचे आश्वासन दिलेले आहे. परंतु आता माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर पूर्णपणे दिशाभूल करणारे आहे. या सदनाचा अवमान करणारे आहे. एवढेच नव्हेतर आपण जे निर्देश दिले होते, त्याचा सुध्दा अवमान करणारे आहे. खरे म्हणजे विना अनुदानित सेवा या प्रयोजनासाठी ग्राहय

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धरल्या जातात. आमच्या पेन्शनसाठी ग्राहय धरल्या जातात, आमच्या वेतन निश्चितीसाठी ग्राहय धरल्या जातात, आमच्या ग्रॅज्युईटीसाठी ग्राहय धरल्या जातात. सेवाशर्ती देखील दोन्ही ठिकाणी सारख्याच आहेत. असे असताना न्यायालयानेही म्हटलेले आहे की, विना अनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राहय न धरणे, यासंबंधातील शासनाचे धोरण चुकीचे आहे. असे स्पष्ट आदेश असताना सुध्दा अनुदानित शाळांमधील सेवा ग्राहय धरणार आहोत यासंबंधीचा जी.आर.काढण्याची आणि त्यासाठी मंत्रीमंडळासमोर जोण्याची गरज नव्हती. तेव्हा न्यायालयाच्या आदेशानुसार विना अनुदानित सेवा वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी ग्राहय धरणार आहात की नाही ? ते मान्य केले होते. पण याबाबतीत येथे चुकीचे उत्तर दिलेले आहे, आमची दिशाभूल केलेली आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, आता मंत्रीमंडळाने निर्णय घेतलेला आहे. पुन्हा एकदा . . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रीमंडळाने निर्णय घेण्याच्या अगोदरपासून ते चालूच होते.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा निर्णय नवीन नाही. ज्या अनुदानित शाळा आहेत, त्यांना 12 वर्षानंतर वरिष्ठ श्रेणी दिलीच आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र. 5584 (पुढे चालू..
श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (पुढे चालू.....

काय मोठा तीर मारला, कशाचा निर्णय घेतला ? निर्णय असा असायला पाहिजे होता की, विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ सर्व प्रयोजनासाठी लागू आहे. केवळ एक जीआरमध्ये वाक्य टाकलेले होते की, वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरु नका. या वाक्याची कोणातरी अधिकाऱ्यांनी खुंटी टाकली, ती काढून टाकता येत नाही काय ? ज्याचा निर्णय झालेला आहे, त्याबाबत मंत्रिमंडळ पुन्हा निर्णय घेत असेल तर ती सभागृहाची दिशाभूल आहे. हा. आपला अपमान आहे. यामध्ये स्पष्टपणे जोर देऊन कॅबीनेट मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले की, "मी आश्वासन दिलेले होते, पण आता त्या आश्वासनासोबत शब्द आहे, आमच्या मराठवाड्यात, विदर्भात शब्दाला महत्व आहे. शब्दाला जागणारे आहोत." पण आपण शब्दाचा अपमान करणारे आहात, आपण जागणारे नाहीत. शब्द हा त्याचे वरचे वजन आहे. "माझा हा शब्द आहे, एक महिन्याच्या आत निर्णय घेतल्याशिवाय मी रहाणार नाही",असे सांगितले जाते. आता कॅबीनेटसमोर जाता, हे सांगायला लाज वाटते. एक महिन्याच्या आत करतो असे आश्वासन दिलेले आहे त्या आश्वासनाचा भंग केलेला आहे, सभागृहाची दिशाभूल केलेलेली आहे. माननीय सभापतींचा हा अपमान आहे, या सार्वभौम सभागृहाचा अपमान आहे. काहीतरी सांगून मंत्रिमंडळाला सोबत घेऊन बुडू नका. कोर्टाच्या निर्णयाचा आधार घेऊन काही तरी चांगला निर्णय घ्या.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा निर्णय पुन्हा विधी व न्याय विभागाला दाखवून पुन्हा एकदा....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात.)

...(अडथळा)...

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण रुलींग द्यावे.

प्रा.बी.टी.देशमुख : हा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे अशाप्रकारे सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे ते शब्द रेकॉर्डवरुन काढून टावेत. 12 वर्षे तो निर्णय अंमलात आहे. तो काल घेतलेला निर्णय नाही. अशाप्रकारचे सांगणे म्हणजे पोरकडटपणाचे, हास्यास्पद आहें.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.हसन मुश्रीफ : सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन पुन्हा एकदा मंत्रिमंडळासमोर जाऊन याबाबतचा निर्णय ताबडतोबीने करण्याचा प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5584 (पुढे चालू..

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आपण याबाबतीत आदेश दिलेले आहेत, त्याचेही उल्लंघन झालेले आहे. हा आमच्यावर अन्याय आहे.

...(घोषणा देण्यात येतात.)...

सभापती : मी हा प्रश्न राखून ठेवतो.

--

इ-3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

सोलापूर शहरात वितरित करण्यात आलेली अतिरिक्त रेशन कार्ड

(2) * 7089 श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर जगताप : सन्मानीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील प्रश्नांचा खुलासा करतील काय :-

(1) सोलापूर शहरात लोकसंख्या व घरे यांच्यापेक्षा जास्त रेशन कार्ड वितरित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सोलापूर शहरात एकूण घरे किती आहेत व माहे मार्च, 2005 अखेर पर्यंत किती रेशन कार्ड वितरित केली आहेत,

(3) तसेच अतिरिक्त रेशन कार्ड वितरित केल्याबाबत चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाबा सिध्दीकी श्री.सुनील तटकरे यांचेकरिता : (1) होय.

(2) सोलापूर महानगरपालिकेकडील आकडेवारीनुसार शहरात 1,56,795 इतकी उंबरठ्यांची संख्या आहे. मार्च, 2005 अखेर 2,41,201 इतक्या शिधापत्रिका वितरीत झालेल्या आहेत.

(3), (4) व (5) चौकशी करण्यात येत आहे.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, सोलापूर शहरामध्ये जवळजवळ 86 हजार बोगस रेशन कार्डस् वाटप करण्यात आलेली आहेत. त्याची चौकशी 15 मार्चपूर्वी पूर्ण करणे अपेक्षित असतांना, आजही ही चौकशी पूर्ण झालेली नाही. यामध्ये अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार दिसतो. माझा प्रश्न असा आहे की, चौकशी का थांबविण्यात आली ? 86 हजार बोगस रेशनकार्ड वाटपामध्ये कोणत्या अधिकाऱ्यांचा हात आहे, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह बहुत गंभीर बात है. इस मामले की चौकशी करने के लिए 4 जून 2005 को एडीशनल कलक्टर ने 3 सदस्यों की कमेटी बनाई है और इस चौकशी में जो भी दोषी होगा, उसके ऊपर सख्त से सख्त कार्रवाई की जाएगी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

ता.प्र.क्र. 7089. . . .

श्री.संजय दत्त : या ठिकाणी बोगस शिधा पत्रिकेचे वाटप झालेले आहे. त्या शिधा पत्रिका कोणत्या व्यक्तींना वाटप करण्यात आलेल्या आहेत ? दुसरा प्रश्न असा की, ही चौकशी सुरु करण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, जब तक चौकशी नहीं होगी, तब तक पता नहीं चलेगा कि किस अधिकारी के समय में ये रोशन कार्ड बनाए गए हैं. चौकशी पूरी होने के बाद में ही यह पता चलेगा कि कितने राशन कार्ड बोगस हैं ? किसी मकान में 5-6 भाड़ेकरु भी रहते हैं, तो जो भी राशन कार्ड बना है, हर राशन कार्ड बोगस होगा, ऐसा जरुरी नहीं है. चौकशी होने के बाद ही यह पता चलेगा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बोगस रेशन कार्ड देणे या खात्याचा सगळयात मोठा धंदा आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7089.....

श्री. मधुकर सरपोतदार....

माननीय मंत्रिमहोदयांची इच्छा असली तर त्यांनी माझ्याबरोबर रेशन कार्ड ऑफिसमध्ये यावे. मी त्यांना या धंद्यामध्ये असलेले सगळे दलाल दाखवीन. किती रुपये दिले तर रेशन कार्ड मिळते, हे माननीय मंत्रिमहोदयांना दाखविण्याची माझी तयारी आहे. माननीय मंत्रिमहोदय, वांद्रे पश्चिमेला राहतात. त्यांना वांद्रे पुर्वेचे रेशनकार्ड पाहिजे असेल तर ते दलाला तर्फे मिळवून देण्याची व्यवस्था करण्याची माझी तयारी आहे. सभापती महोदय, मी या सभागृहात जबाबदारीने बोलत आहे. माननीय मंत्रिमहोदयांना ही सगळी माहिती असतांना सुध्दा ते अशा प्रकारचे उत्तर देत असतील तर त्याचा अर्थ असा होतो की, जे लोक अशा प्रकारे रेशन कार्ड देतात ते सगळे लोक मिळालेले आहेत. हे दलाल रेशनकार्ड ऑफिसच्या बाहेर उभे असतात. त्यांच्याकडून अर्ज आल्या शिवाय रेशन कार्ड ऑफिसमधील कर्मचारी काम करीत नाहीत, हा माझा अनुभव आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी स्वत: याबाबतीत काही अनुभव घेतलेला आहे काय? माननीय मंत्रिमहोदयांनी सोलापूर येथील रेशनकार्ड ऑफिसमध्ये जाऊन याबाबतची माहिती घेतली आहे काय ? बोगस रेशनकार्ड देणारे कोण आहेत? दलाल आणि रेशन कार्ड आफिसमध्ये काम करणारे कर्मचारी यांच्यातील हितसंबंध कसे गुंतले आहेत? याची माननीय मंत्रिमहोदयांना माहिती आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मा. सरपोतदार जी बहुत सीनियर मेम्बर हैं और वे बता रहे है कि इनके क्षेत्र में गलत काम हो रहे हैं तो मैं इनको आश्वासन देता हूँ कि सभागृह समाप्त होने के बाद सीधे वहां पर जाएंगे और जो भी दोषी लोग पकड़े जाएंगे, उनके खिलाफ कार्रवाई करेंगे. अभी 7 जून को माननीय मंत्री महोदय ने मीटिंग ली, थी और इस बात को बहुत गंभीरता से लिया जा रहा है. जब कभी कमेटी बनती है और जब उसकी चौकशी पूरी हो जाएगी, उसमें जो भी दोषी पाए जाएंगे, शासन उनके ऊपर सख्त से सख्त कार्रवाई करेगा.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, या प्रश्नाला उत्तर देतांना शासनाने हे मान्य केलेले आहे की, रेशन कार्ड वितरणामध्ये फार मोठा गलथानपणा झालेला आहे. रेशनकार्ड वितरणाच्याबाबतीत राज्यामध्ये सुरु असलेला गलथानपणा रोकण्याकरिता शासन काही नियम तयार करणार आहे काय? तसेच याबाबतीत जी चौकशी करण्यात येत आहे, ती किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, रेन्डम चॅकिंग डिपार्टमेंट हमेशा करता रहता है, लेकिन यहां पर 1 लाख 56 हजार 795 घर हैं और हर घर में जाकर चॅकिंग करना होगा. 3 महीने के अन्दर शासन यह चौकशी पूरी करेगा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहामध्ये या प्रश्नावर अनेक वेळा चर्चा--- झालेली आहे. हे रेशन कार्ड केवळ स्वस्त धान्याच्या दुकानातून गहू, तांदूळ किंवा साखर विकत घेण्याकरिता तयार केले जात नाही, तर ते पासपोर्ट काढण्यासाठी किंवा अन्य ठिकाणी त्याचा गैर-वापर किंवा गैरउपयोग करण्यासाठी काढले जातात. या संदर्भात सध्याची विद्यमान प्रणाली किंवा जी पध्दती आहे त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्या प्रमाणे रेशनकार्ड ऑफिससमोर उभे असलेले दलाल आणि रेशन कार्ड ऑफिसमधील अधिकारी संगनमत करुन, भ्रष्टाचार करुन, रेशन कार्डचे वाटप करतात. त्यामुळे शासनाने याबाबतची चौकशी कोणालाही करावयास सांगितली तरी त्यांचा रिपोर्ट खरा येईल अशातला भाग नाही. म्हणून यातील भ्रष्टाचार रोकण्याकरिता इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचा उपयोग करुन, परमनन्ट डाटा एकत्र करुन, त्याच्या आधारावर सिस्टिम तयार केली तर ताबडतोब माहिती मिळू शकेल. त्या सिस्टिमला मतदान याद्या जोडून, त्यासंबंधीचे सॉफटवेअर तयार करुन, त्या दोघांमध्ये को-ऑर्डिनेशन असेल तर ताबडतोब माहिती मिळू शकेल. जन्ममृत्यूचे दाखले पाच मिनिटात मिळतात, त्या पध्दतीने यासंबंधीची संपूर्ण सिस्टिम अपग्रेड करण्याची गरज आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबतचा पॉलिसी निर्णय घेतला, तर हा प्रश्न विचारण्यामागील उद्देश सफल होईल.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, शासन कम्प्यूटराइझेशन के बारे में काम कर रहा है और इसके लिए टेंडर डॉक्यूमेंट तैयार हो रहा है, वह प्रोसस में है. जब यह काम पूरा हो जाएगा तो दूध का दूध और पानी का पानी हो जाएगा.

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड...

श्री. नितीन गडकरी : कम्प्युटरायझेशन के बारे मे बहुत दिनों से चर्चा चल रही है. मुझे दुख के साथ कहना पड़ता है कि जब हमारी सरकार थी, उस समय से अन्न व नागरी पुरवठा विभाग इसके बारे में सोच रहा है. यह काम कब तक होगा ? आर.टी.ओ. के पास से हमने माननीय विलासराव देशमुख और मा. परिवहन मंत्री के नाम का लाइसेंस लाकर दिया है. हम आपके नाम का राशन कार्ड बनवाकर ला सकते हैं. आखिर यह सब क्या चल रहा है ? कम्प्युटरायझेशन का काम कब तक पूरा होगा ?

श्री. बाबा सिद्दीकी : हा प्रश्न वेगळा आहे परंतु महत्वाचा आहे.

श्री. नितीन गडकरी : कम्प्युटरायझेशन का काम कितने दिनों मे पूरा होगा

श्री. बाबा सिद्दीकी : यह प्रश्न महत्वपूर्ण है, इसलिए मैं सभागृह को बताना चाहता हूँ कि इस बारे में दिनांक 4 अप्रैल 2005 को हमने मीटिंग ली थी और 13.04.2005 को प्रोजक्ट इम्पलीमेंटेशन कमेटी बनी है. टेंडर डॉक्यूमेंट के काम को फायनल करने की प्रोसस चालू है. हम इस कार्य को पूरा करने के लिए टाईम बॉण्ड प्रोग्राम नहीं बता सकते, लेकिन यह प्रश्न महत्वपूर्ण है, इसलिए सरकार गंभीरता से इस बारे में कोशिश कर रही है.

श्री. नितीन गडकरी : क्या आप इस योजना को 6 महीने के अन्दर लागू करेंगे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय . . .

सभापती : माननीय कॅबिनेट मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित आहेत. आपण या एका शहराचा नमुना पाहिला तर त्या ठिकाणी 1 लाख 56 हजार कुटुंबे किंवा घरे आहेत आणि 2 लाख 41 हजार रेशन कार्ड आहेत. म्हणजे 90 हजार बोगस रेशन कार्ड दिसतात. यामध्ये थोडे कमी असतील किंवा जास्त असतील. सर्व ठिकाणी जर असे असेल तर मग रेशनचे नियतन किती आहे आणि गैरप्रकार किती होतात ही गंभीर बाब लक्षात घेऊन येत्या तीन चार महिन्यांमध्ये सर्व ठिकाणी जर अशा पध्दतीने आपण व्यवस्था केली, कॉम्प्युटराईज्ड पध्दत वापरात आली तरच खऱ्या अर्थाने प्रतिबंध बसेल अशी सन्माननीय सदनाची इच्छा आहे. याबाबतीत आपण पॉझीटीव्ह कारवाई सदनाला सांगावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

ता. प्र. क्र.7089 .....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदारसाहेब यांनी अत्यंत गंभीर मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपणही सांगितले की, सोलापूर शहरामध्ये मोठया प्रमाणात रेशन कार्ड दिली गेली आहेत. चौकशी समितीचे काम चालू आहे. आपण म्हणाला की, अनेक वेळा चौकशी समिती नेमली जाते आणि मग त्यातून फारसे काही निष्पन्न होत नाही परंतु मी सभागृहाला एवढेच सांगेन की, सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर प्रधान सचिवांना सोलापूरला पाठवून इतक्या मोठया प्रमाणावर कशा पध्दतीने शिधापत्रिकांचे वाटप झाले याची चौकशी स्वत: करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात येईल आणि कोणत्याही स्तरावरच्या अधिकाऱ्यांचा यामध्ये सहभाग असेल तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी कॉम्प्युटरायझेशनचा टाईम बॉण्ड कार्यक्रम किती दिवसात करण्यात येईल असे विचारले. यासंदर्भात आठ दिवसामध्ये निविदा प्रसिध्द करु. निविदा प्रसिध्द करुन टेंडरच्या संदर्भात जो काही तांत्रिक कालावधी लागतो तेवढे कमीतकमी दिवस वापरुन याबाबतीत अंमलबजावणी केली जाईल. कॉम्प्युटराईज्ड शिधापत्रिका दिल्यानंतर नव्याने पुनरसर्व्हे होईल. आमची धारणा अशी आहे की, प्रत्येक शिधापत्रिकेवर कुटुंबप्रमुखांचे आणि सर्वांचे फोटो घेतले जावेत जेणेकरुन त्यांचे आयडेंटीफिकेशन व्हेरिफाय करता येऊ शकेल. प्रत्येक तालुका स्तरावर जर हा डाटा उपलब्ध झाला, शहराच्या ठिकाणी, मुंबई शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी हा डाटा उपलब्ध झाला तर यावर अचूकपणे नियंत्रण करता येईल. ही सबंध कारवाई कमीतकमी कालावधीमध्ये तात्काळ केली जाईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

विभागीय जात पडताळणी प्रक्रियेअंतर्गत राज्यात जातपडताळणीची प्रलंबित असलेली प्रकरणे

(३) * ५५९४ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदिश गुप्ता , श्री. विनोद तावडे : सन्माननीय सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय जात पडताळणी प्रक्रियेअंतर्गत राज्यात जात पडताळणीची ३७ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे मोठया प्रमाणात ही प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालय प्रवेश, वसतीगृह प्रवेश, शिष्यवृत्ती आदि कामासाठी खूपच त्रास सहन करावा लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकालात काढण्यासाठी तसेच मुलांची गैरसोय होऊ नये म्हणून या प्रकरणी शासन स्तरावर कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम, **श्री. चंद्रकांत हंडोरे यांच्याकरिता** : (१) होय.

(२) अशंत:खरे आहे,

प्रसंगत: नमुद करण्यात येते की, "विद्यार्थ्यांना वसतीगृह प्रवेश व शिष्यवृती यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्राची मागणी केली जात नाही".

(३) प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकालात काढण्याबाबत सर्व समित्यांना वेळोवेळी शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी स्पष्ट विचारले आहे की, विभागीय जात पडताळणी प्रक्रियेअंतर्गत राज्यात जात पडताळणीची 37 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत हे खरे आहे काय ? त्याला जोडून दुसरा प्रश्न असा विचारला आहे की, असल्यास, अशा प्रकारे मोठया प्रमाणात ही प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालय प्रवेश, वसतीगृह प्रवेश, शिष्यवृत्ती आदी कामासाठी खूपच त्रास सहन करावा लागत आहे हेही खरे आहे काय ? या ठिकाणी दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर "अंशत: खरे आहे" असे दिले आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5594.... श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, जून व जुलै महिना हा ॲडमिशनचा महिना असतो, राज्यात सर्वदूर प्रवेश चालू असतात. या राज्यामध्ये जात पडताळणीचे 37 हजार अर्ज प्रलंबित आहेत हे शासनाने मान्य केलेले आहे. मा.सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी नाशिक विभागाची बैठक घेतली होती त्यावेळी त्यांनी प्रकरणे प्रलंबित असल्याचे मान्य केले होते. राज्यात 37 हजार प्रकरणे प्रलंबित असण्याचे कारण काय ? ही प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे काही विद्यार्थ्यांना प्रवेशापासून मुकावे लागले आहे, काही विद्यार्थ्यांना त्रास झाला आहे. याला जे जे जबाबदार असतील त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय आणि प्रलंबित प्रकरणांबाबत किती दिवसामध्ये शासन निर्णय घेणार आहे ?

श्री.धर्मरावबाबा अत्राम : प्रलंबित प्रकरणांमध्ये वेगवेगळया बाबी आहेत. राज्यात 61,074 प्रकरणे प्रलंबित आहेत. यात पुष्कळ बाबी आहेत, काही त्रुटी आहेत. काही त्रुटी पूर्ण न केल्यामुळे जातीचा दाखला देण्यात आलेला नाही. शैक्षणिक....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, 61 हजार प्रकरणांपैकी ज्यामध्ये त्रुटी आहेत ती प्रकरणे निकालात काढावयाची आहेत. जे पात्र नाहीत त्यांचा अर्ज रिजेक्ट करावा. परंतु त्रुटी आहेत म्हणून प्रकरणे प्रलंबित आहेत हे कसे काय ? वास्तविक तुम्ही असे उत्तर दिले पाहिजे की, आम्ही ज्यांचा अर्ज योग्य असेल त्याला प्रमाणपत्र देऊ. पडताळणीचा हा अहवाल आहे. म्हणून योग्य नसेल त्याला रिजेक्ट करा. पण त्रुटी म्हणजे काय ? कागदपत्रांची त्रुटी असेल तेथे 500 रुपये द्या, म्हणजे सगळया ठिकाणी काय चालले आहे ? लोकशाही आघाडी शासनाने काय सुरु केले आहे ते समजत नाही. मुले कॉलेजमध्ये प्रवेशासाठी येत आहेत. मग त्याचवेळी पडताळणी का करीत नाही, प्रकरणे प्रलंबित का राहतात ? तुम्ही त्यांना सांगितले पाहिजे, अर्जासोबत हया हया गोष्टी जोडल्या तरच अर्ज स्वीकारला जाईल आणि स्वीकारल्यानंतर 3 दिवसामध्ये पडताळणी प्रमाणपत्र घेऊन जावे.

श्री.धर्मरावबाबा अत्राम : यासंदर्भात सर्व विभागीय चेअरमनना स्पष्ट डायरेक्शन्स दिलेल्या आहेत की, 90 दिवसामध्ये अर्ज निकालात काढला पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,....

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, यामध्ये वेगवेगळे निकष आहेत. ज्यामुळे काही प्रकरणे प्रलंबित आहेत, काही प्रकरणे त्रुटींमुळे प्रलंबित आहेत.

सभापती : प्रकरण अपूर्ण आहे असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? ज्या त्रुटी असतील त्या तुम्ही सांगाव्यात. अर्जासोबत तुम्ही या या गोष्टी जोडाव्यात असे सांगितले की, प्रकरण संपून जाईल.

श्री.धर्मरावबाबा अत्राम : 7 हजार विद्यार्थी/विद्यार्थीनी 12 वी मध्ये बसले आहेत. नियमाप्रमाणे 7 हजार विद्यार्थी/विद्यार्थीनींना 31 मे पर्यंत जे बारावीचे विद्यार्थी आहेत आणि ज्यांनी अर्ज केला आहे त्यांना जातीचे दाखले देणार आहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर : मंत्रिमहोदयांनी आताच सांगितले की, या प्रकरणांचा निर्णय 90 दिवसामध्ये लागला पाहिजे. मीही उल्लेख केला की, सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी नाशिक येथे मार्च महिन्यामध्ये विभागीय बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये त्यांनी काय सांगितले होते ? नाशिक जिल्हयामध्ये विकास कामांचा आढावा घेण्यासाठी या आठवडयामध्ये मा.मुख्यमंत्री यांच्यासह दोन मंत्री हजर राहणार आहेत. राज्यातील जात पडताळणीसंबंधी 82 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. गेल्या दीड महिन्यामध्ये 45 हजार प्रकरणे निकालात निघाली आहेत उर्वरित 37 हजार प्रकरणे निकालात निघावयाची आहेत. मार्च महिन्यापासून 90 दिवसांचा अवधी संपला तरी ही प्रकरणे निकालात का निघाली नाहीत ? आता जुलै महिना चालू आहे. मंत्रिमहोदयांनी आता दुरुस्ती करुन 61 हजार प्रकरणे असल्याचे सांगितले आहे. परंतु त्यावेळच्या 37 हजार प्रकरणांचा आतापर्यंत निकाल का लागला नाही ?

नंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे : मा.सदस्यांनी केलेला उल्लेख बरोबर आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये मी सर्व विभागीय समाजकल्याण अधिका-यांची बैठक घेतली होती. त्यावेळी 82 हजार प्रकरणे प्रलंबित होती. तीन महिन्यामध्ये जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना त्यांना दिल्यानंतर पुन्हा मे महिन्यामध्ये आढावा घेण्यात आला त्यावेळी 82 हजार पैकी 30 हजार प्रकरणे निकाली काढण्यात आलेली होती. यामध्ये अडचणीचा भाग असा आहे की, वेगवेगळ्या विभागाच्या शासकीय कर्मचा-यांच्या पदोन्नती संदर्भातील फाईल्स सरसकट समाजकल्याण विभागाकडे पाठविल्या जातात. त्यामुळे या प्रकरणांचा आकडा मोठा दिसतो. पदोन्नती जरी एक-दोन वर्षानंतर होणार असली तरी त्या फाईल्स आताच विभागाकडे आलेल्या आहेत. त्यामुळे हा आकडा सतत वाढताना दिसतो. जात पडताळणीसाठी वेगळी समिती निर्माण करण्यासंबंधीचा विचार आम्ही करीत आहोत. सध्या असलेली कमिटी पार्ट-टाईम असल्यासारखी आहे. अतिरिक्त आयुक्त, महसूल हे त्यांच्या कामाव्यतिरिक्त अतिरिक्त वेळ देऊन हे काम करीत आहेत. विद्यार्थी तसेच शासनातील कर्मचारी यांना जात पडताळणी समितीकडून प्रकरण निकाली लागे पर्यन्त फार त्रास होत आहे याची शासनाला जाणीव आहे. या सदनामध्ये देखील सातत्याने हा प्रश्न उपस्थित होतोय. म्हणून जात पडताळणीसाठी वेगळी समिती निर्माण करण्याचा निर्णय आम्ही करीत आहोत. ..

श्री. नितीन गडकरी : विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे काय होणार ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : विद्यार्थ्यांचे एकूण 23 हजार अर्ज आलेले आहेत. 11वीच्या विद्यार्थ्यांचे 7 हजार आणि 12वीच्या विद्यार्थ्यांचे 15 हजार अर्ज आलेले आहेत. कागदपत्रांच्या त्रुटींची 6 हजार प्रकरणे आहेत. दक्षता पथकाकडे 1872 प्रकरणे पाठविलेली आहेत. 5 हजार प्रकरणे तपासली असून त्यावर आयुक्तांची स्वाक्षरी व्हायची आहे.

श्री. नितीन गडकरी : आयुक्तांना प्रकरणे निकाली काढण्यास वेळ नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे आपण काय करणार ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. त्यामुळे अत्यंत गांभीर्यपूर्वक या गोष्टीमध्ये आम्ही लक्ष घातले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/

(ता.प्र.क्र.5594...)

सभापती : जात पडताळणीमध्ये विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देणे हे आपले कर्तव्य आहे. ज्यांची दोन वर्षानंतर गरज आहे अशी शासकीय कर्मचा-यांची जात पडताळणीची प्रकरणे असतील तर ती थोड्या कमी प्राधान्याने निकाली काढलीत तरी चालतील. परंतु विद्यार्थ्यांच्या जात पडताळणीच्या प्रकरणांना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. याठिकाणी आपण सांगितले की, आयुक्तांना सही करण्यासाठी वेळ झाला नाही. अशा प्रकारचे कारण या सभागृहाने पुनश्च ऐकता कामा नये अशी माझी आपणास सूचना आहे.

श्री. विनोद तावडे : आयुक्त हे स्वत:ला क्वासी ज्युडिशियल ॲथॉरिटी मानतात त्यामुळे ते तुमच्या फोनला किंवा चिठ्ठीला विचारत नाहीत. मागच्या वेळी तत्कालीन मा.सदस्य श्री. भाई गिरकर आणि मी हा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित केला होता त्यावेळी विद्यार्थ्यांची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढली जातील असे आश्वासन दिलेले होते. दक्षता पथकाकडून तपासणी करुन घ्यावयाची असेल तर संबंधित विद्यार्थ्यांला गाडीची व्यवस्था करावी लागते. मग ते अधिकारी राजापूरला जाऊन नंतर गोवा फिरुन येतात. ही वस्तुस्थिती आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 90 दिवसाच्या आत निकाली न निघालेली 12वीच्या विद्यार्थ्यांची किती प्रकरणे आहेत ? ही प्रकरणे निकाली न काढणा-या अधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात?

...नंतर श्री.गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, 5 हजार प्रकरणांची तपासणी पूर्ण झालेली असून त्यावर सही करावयाची राहिली आहेत ती प्रकरणे एका आठवडयाच्या आत निकाली काढण्यात येतील. यासंदर्भात जवळ जवळ 2155 प्रकरणे समितीकडे प्रलंबित आहेत ती प्रकरणे देखील लवकरात लवकर निकाली काढण्याचा प्रयत्न करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, फक्त सही करण्यासाठी 5 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. ती प्रकरणे 24 तासांच्या आत निकाली गेली पाहिजेत.

सभापती : जातपडताळणी समितीकडे सही अभावी 5 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. ती प्रकरणे सहया करुन येत्या एक दोन दिवसात निकाली काढण्यात येतील काय?

श्री. चंद्रकांत हंडोरे : होय. अजून 2155 प्रकरणे जातपडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत ती प्रकरणे देखील येत्या 15 दिवसात निकाली काढण्यात येतील. यासंबंधीची मुदत ही ऑगस्ट महिन्यापर्यन्त वाढवून घेण्यात आलेली आहे.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, वडिलांचे प्रमाणपत्र व्हॅलीड ठरविले जात नाही तो पर्यन्त त्यांच्या मुलांचे जातीची प्रमाणपत्रे व्हॅलीड केली जात नाहीत. मी उदाहरण सांगतो की, माझ या विभागात मंठा येथे तलाठी आहेत. त्याच्याकडे एका विद्यार्थ्याने त्याच्या वडिलांच्या जन्माच्या प्रमाणपत्राची प्रत मागितली परंतु त्या विद्यार्थ्यास आपल्या वडिलांच्या जन्माच्या प्रमाणपत्राची प्रत मिळू शकली नाही. त्यामुळे त्या विद्यार्थ्यास देखील जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध होऊ शकले नाही. जर अशा प्रकारची प्रमाणपत्रे जातीची प्रमाणपत्रे मिळण्यासाठी शासनाकडून मागितली जात असतील तर विद्यार्थ्यांना जातीची प्रमाणपत्रे कशी काय मिळणार ? जातपडताळणी समितीकडे जी प्रलंबित प्रकरणे आहेत ती लवकरात लवकर निकाली निघावीत अशी सर्व सभासदांची भावना आहे. त्या भावनेचा आदर मंत्री महोदयांकडून केला जाईल काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, 1950 ची अट शिथील झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जातीची प्रमाणपत्रे मिळण्यास अडचण येणार नाही. जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेली प्रकरणे लवकर निकाली काढण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरात असे नमूद केले आहे की, प्रलंबित प्रकरणे त्वरित निकालात काढण्याबाबत सर्व समित्यांना वेळोवेळी शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाकडून वारंवार सूचना देऊनही विद्यार्थ्यांना जातीची प्रमाणपत्रे मिळण्यास त्रास सहन करावा लागत आहे. शासनाकडून सूचना देऊनही सुधारणा होत नाहीत. जातपडताळणी समितीकडे कर्मचा-यांची संख्या अपूर्ण असल्यामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत काय ? या समितीच्या कार्यालयात कर्मचा-यांची संख्या अपूर्ण असेल तर ती वाढविण्याच्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : या ठिकाणी जात पडताळणीची कामे लवकरात लवकर व्हावीत म्हणून शासनाने पूर्णवेळ काम करणारी समितीची निर्मिती करण्याचे ठरविले आहे. सदर समिती निर्मितीसंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर आणणार आहोत. पूर्णवेळ काम करणा-या समितीची निर्मिती झाल्यानंतर या कार्यालयाकडे प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्याचा प्रयत्न करणार आहोत.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मी या ठिकाणी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे..

सभापती : या सभागृहात सर्व सदस्य हे जबाबदारीनेच बोलत असतात..

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, माझ्या मुलास जातीचे प्रमाणपत्र पाहिजे होते. माझ या मुलास तहसिलदार यांनी सांगितले की, तुमच्या वडिलांचे जन्माचे प्रमाणपत्रे घेऊन ये. मी माझ्या जन्माचे प्रमाणपत्र घेण्यासाठी इंदोरा येथील प्राथमिक शाळेत गेलो आणि तेथून लिव्हींग सर्टिफिकेट आणून दिले. त्यानंतर माझ्या मुलास जातीचे प्रमाणपत्र मिळाले. माझ्या भावाच्या मुलास म्हणजे पुतण्यास देखील जातीचे प्रमाणपत्र हवे होते. त्यास देखील तहसिलदारांनी सांगितले की, तुझ्या वडिलांचे जन्माचे प्रमाणपत्र घेऊन ये. त्यास देखील ही सर्व प्रोसीजर पूर्ण करावी लागली. विद्यार्थ्यांना जातीची प्रमाणपत्रे देण्यास संबंधित विभागाचे अधिकारी रेंगाळत ठेवतात. अनेक विद्यार्थ्यांना जातीची प्रमाणपत्रे वेळेवर मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्यास प्रवेश मिळत नाही. सभापती महोदय, जातपडताळणी समितीकडील 5 हजार प्रकरणे अतिरिक्त आयुक्त,महसूल यांच्या सही अभावी रोखून ठेवली आहेत. त्यासंदर्भात माझे असे म्हणणे आहे की,

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5594...

श्री.निकोसे...

या अतिरक्त आयुक्तांनी रात्रभर जागून या 5 हजार प्रमाणपत्रांना मंजुरी दिली पाहिजे. मंत्री महोदय आपल्या दालनात रात्री 12.00 ते 1.00 वाजेपर्यन्त बसून कामे करीत असतात. विरोधी पक्षाचे नेते त्याच प्रमाणे सभागृहातील सदस्य रात्री 2.00 वाजेपर्यन्त विविध विषयांचा अभ्यास करीत असतात आणि अधिकारी मात्र झोपा काढीत असतात. सभापती महोदय, या पाच हजार प्रलंबित अर्जावर अतिरिक्त आयुक्तांनी सहया केलेल्या आहेत अशा प्रकारची माहिती उद्या सभागृह सुरु होण्याच्या पूर्वी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5594 पुढे सुरु...

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. रमेश निकोसे यांनी ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या त्याच्याशी मी सहमत आहे. 1950 च्या कायद्यानुसार जी अट होती त्यामुळे अधिका-यांना जातीची प्रमाणपत्रे देताना अडचण येत होती. परंतु 1950 च्या कायद्यातील ती अट आता शिथिल केलेली आहे त्यामुळे मा. सदस्यांनी जी परिस्थिती सांगितली ती आता भविष्यात उद्भवणार नाही. सहा अतिरिक्त विभागीय आयुक्तांमार्फत ही प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, 1950 च्या कायद्यातील अट शिथिल करण्यात आलेली आहे ती अनु.जाती करिता आहे. अनु.जमातीकरिता नाही.हे खरे आहे काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, अनु.जातीसाठी अट शिथिल केली आहे. ट्रायबलसाठी नाही.

सभापती : मा.सदस्यांनी अनु.जमातीकरिता अट शिथिल केलेली नाही अशी हरकत घेतली आहे.

श्री. धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, जी अट शिथिल करण्यात आलेली आहे ती फक्त अनु.जाती आणि ओबीसींकरिता आहे. ट्रायबलसाठी नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आदिवासी व अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना
दिलेल्या जमिनी बेकायदेशीर खरेदी केल्याबाबत

(४) * ७१४३ श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. यशवंतराव गडाख :
सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (ता.राजुरा,जि. चंद्रपूर) येथील सर्वे नं.१४४, १४५, १४६ व १४९ पैंकी शासनाने पट्टे आधारे शेती प्रयोजनाकरिता आदिवासी व अनुसूचित जाती व जमातीच्या भूमिहीन लोकांना दिलेल्या जमिनी फसवणूक करुन बेकायदेशीरपणे खरेदी केलेल्याविरुध्द अनुसूचित जाती-जमाती कायद्यान्वये कारवाई करुन त्यांच्या जमिनी त्यांना परत मिळण्यासाठी अध्यक्ष, आदिवासी अन्याय निवारण जनआंदोलन विकास समिती, राजुरा, जि. चंद्रपूर यांनी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. आदिवासी विकास मंत्री व मा. प्रधान सचिव, आदिवासी विज्ास विभाज मंत्रालय, यां-ा दिनांक ७ एप्रिल, २००५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भूमीहीनांना त्यांच्या जमीनी त्यांना परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे,श्री. विलासराव देशमुज,यांच्याकरिता : (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) सदरचे प्रकरण चौकशी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी विभागीय आयुक्त नागपूर यांचेकडे सोपविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयातील राजुरा तालुक्यात आदिवासी आणि अनु.जाती-जमातीच्या लोकांच्या जमिनी बेकायदेशीरपणाने खरेदी करण्याचे प्रकार घडलेले आहेत. संपूर्ण राज्यामध्ये अनेक ठिकाणी अशा स्वरुपाची प्रकरणे समोर आलेली आहेत. अशी प्रकरणे पुन्हा होऊ नयेत याकरिता शासन नियम तयार करणार आहे काय ? राजुरा तालुक्यामध्ये जे प्रकरण घडले याची चौकशी सुरु आहे असे उत्तरात म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, सदरहू चौकशी किती कालावधीमध्ये पूर्ण होणार आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयामधील राजुरा तालुक्यातील प्रकरणाचा उल्लेख याठिकाणी करण्यात आला. सर्वे नं. 144,145,146 आणि 149 याठिकाणच्या शासनाने आदिवासी तसेच अनु.जाती-जमातीच्या भूमिहीन शेतक-यांना दिलेल्या जमिनी बेकायदेशीरपणाने विकल्या गेल्या किंवा त्या बिगरशेती करण्यात आल्या. यासंदर्भात श्रीमती राधाबाई आत्राम यांनी तक्रार केल्यानंतर ती तक्रार तपासण्यात आली आणि त्यामध्ये प्रथमदर्शनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7143 पुढे सुरु...

डॉ. राजेंद्र शिंगणे ....

बेकायदेशीरपणाने असा व्यवहार झाला किंवा जमिनी बिगरशेती करण्यात आल्या असे आढळून आले. त्यामुळे या प्रकरणाची संपूर्ण चौकशी आणि पुनर्विलोकन करण्याच्या सूचना 6.7.05 रोजी विभागीय आयुक्त,नागपूर यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत यासंदर्भात कारवाई करण्याचे निर्देशही शासनाने आयुक्तांना दिले आहेत.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की अशी प्रकरणे भविष्यात घडू नयेत यासाठी शासन काही विशिष्ट नियम तयार करणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, यासंदर्भात कायद्यामध्ये अगोदरच तरतुदी केलेल्या आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि कूळ वहिवाट कायदा 1974,अधिनियम 35 आणि 36 कायदा अगोदरच अस्तित्वात आहे. परंतु सध्या अस्तित्वात असलेल्या नियमांमध्ये पळवाटा काढून किंवा नियमांचे उल्लंघन करुन अशा प्रकारचे व्यवहार केले जातात हे चंद्रपूर जिल्हयातील राजुरा तालुक्यात झालेल्या जमिनीच्या व्यवहारावरुन समोर आलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या संदर्भातील कायदे आणि नियम अधिक प्रभावीपणे लागू करण्यासबंधी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शासन विचार करणार आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अनुसूचित जाती,अनुसूचित जमातीच्या भूमिहीन लोकांना दिलेल्या जमिनी इतर लोकांनी खरेदी केल्या आहेत त्यांच्याविरुध्द आता कारवाई करण्यात येत आहे.माननीय मंत्रिमहोदयांनी असे सागितले की, ही कारवाई एक महिन्यात करु. परंतु त्यावरुन हे स्पष्ट होत नाही की, ज्यांच्या जमिनी खरेदी करण्यात आल्या होत्या त्यांच्या जमिनी त्यांना परत करण्याची कार्यवाही पूर्ण होईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की,बेकायदेशीरपणे ज्यांच्याकडून जमिनी खरेदी करण्यात आल्या होत्या अशा व्यक्तींची संख्या किती आहे आणि त्यांच्याकडून खरेदी केलेल्या जमिनी त्यांना परत करण्याची कार्यवाही किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे ?

डॉ.राजेन्द्र शिंगणे : सभापती महोदय, सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सर यांनी ज्याचा उल्लेख केलेला आहे त्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे ज्यांच्या जमिनी बेकायदेशीरपणे विकत घेतलेल्या असतील किंवा नियम तोडून एन.ए. करण्याची परवानगी जिल्हाधिका-यांनी किवा इतर अधिका-यांनी दिलेली असेल अशा व्यक्तीची संख्या जवळ जवळ आठ ते दहा इतकी आहे.या संदर्भात चौकशी व आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी हे प्रकरण विभागीय आयुक्तांकडे दिलेले आहे आणि एक महिन्याच्या आत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यास त्यांना सागण्यात आलेले आहे. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर संबंधितांच्या जमिनी परत करण्यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, आदिवासी किंवा अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांना दिलेल्या जमिनी त्यांची फसवणूक करुन काही लोकांनी खरेदी केल्या आहेत तेव्हा या जमिनी खरेदी करणारे लोक कोण आहेत ? बिगर आदिवासी लोकांनी आपल्या मर्जीतील आदिवासींच्या नावाने या जमिनी खरेदी करावयाच्या आणि त्याचा उपभोग मात्र स्वत:घ्यावयाचा असे तर तेथे घडलेले नाही ना ?

डॉ.राजेन्द्र शिंगणे : या जमिनी खरेदी करण्यामध्ये काही आदिवासी होते तर काही बिगर आदिवासी होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7143...

प्रा.जोगेन्द्र कवाडे : सभापती महोदय,आदिवासी व अनुसूचित जाती जमातीच्या भूमिहीन शेतमजुरांना शासनाच्यावतीने मालकी हक्काने जमिनीचे पट्टे देण्यात आले होते. चन्द्रपूर जिल्हयातील राजुरा तालुक्यातील या लोकांची फसवणूक करुन इतर लोकांनी त्यांच्याकडील जमिनी खरेदी केल्या आहेत. आज जरी चन्द्रपूर जिल्हयातील राजुरा तालुक्यातील हे प्रकरण असले तरी सुध्दा संपूर्ण राज्यात अशा प्रकारे आदिवासी व अनुसूचित जाती जमातीच्या भूमिहीन लोकांना मिळालेल्या जमिनीचे पट्टे त्या लोकांची फसवणूक करुन खरेदी करण्याचे प्रकार झालेले आहेत काय ? तसे

झाले असेल तर शासन त्याची चौकशी करणार आहे काय ? आणि खरेदी केलेल्या जमिनी आदिवासी व अनुसूचित जाती जमातीच्या भूमिहीन शेतमजुरांना परत देण्यात येणार आहे काय ?

डॉ.राजेन्द्र शिंगणे : सभापती महोदय, राज्यातील इतर भागात सुध्दा अशा प्रकारे बेकायदेशीरपणे जमिनी खरेदी विक्री करण्याचे प्रकार जर कोठे आढळून आले किंवा शासनाकडे किंवा संबंधित अधिका-याकडे त्यासबंधीच्या तक्रारी आल्या तर निश्चितपणें या सर्व प्रकरणाची चौकशी शासन वेळोवेळी करीत असते. यापुढे सुध्दा ही चौकशी अधिक प्रभावीपणे करुन त्या आदिवासींना जमिनी परत करण्याचे काम किंवा त्यांना फसवलेले असेल तर त्यासंबंधीची कारवाई करण्याचे काम शासन निश्चित करणार आहे .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जमीन खरेदी केल्यानंतर रजिस्ट्रारच्या ऑफिसमध्ये खरेदी खताची नोंदणी केली जाते.तेव्हा त्याचवेळी सबंधित व्यक्ती आदिवासी आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी त्या व्यक्तीकडून तो आदिवासी असल्याचा दाखला धेतल्याशिवाय त्या व्यक्तीच्या जमिनीच्या खरेदीची नोंदणी केली जाणार नाही अशा प्रकारची योजना शासन सुरु करणार आहे काय ?

डॉ.राजेन्द्र शिंगणे :सभापती महोदय, या संदर्भातील कायदे आणि नियम अगोदरच सुस्पष्ट आहेत.त्यामुळे यासाठी वेगळी योजना करण्याचे काही कारण नाही.परंतु हे कायदे आणि नियम जर पाळले जात नसतील तर त्यासंबंधी योग्य ती खबरदारी पुढच्या काळात घेण्याचा शासन प्रयत्न करील.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धित प्रत / शीघ्रलिपी नोंदी

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज ायम वि ा अ ुदा ित दुर्ग म भाजातील शाळांबाबत फेर ि र्जय

(5) * 5614 श्रीमती संजीव ी रायज र : स-मा-न-ीय शालेय शिजज, क्रि डा व युवज ज ल्याज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) ज ायम वि-ा अ-ुदा-ित शाळांबाबत दुर्ग म भाजातील शाळांच्या बाबत शास-ा फेरविचार ज रजार आहे, अशा तऱ्हेचे आश्वास-ा अर्थसंज ल्पीय अधिवेश-ात व महाराष्ट्र राज्य शिजज परिषदे समवेत झालेल्या बैठजीत चर्चेच्या वेळी मा. मंत्रिमहोदयां-ी दिले आहे, हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, या संबंधी शास-ा-े आदेश नि र्जमित जे ले आहे ज ाय, असल्यास, त्यांचे स्वरुप ज ाय व त्या-ुसार ज ाय ज ार्यवाही जे ली वा ज रज्यात येत आहे,

(3) अद्याप नि र्जय घेतला -ासल्यास विलंबाची ज ारजे ज ाय व तो जे व्हा घेज्यात येईल ?

श्री. हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरजे यांच्याकरिता : (1),(2) व (3) ज्या संस्थां-ी स्वेच्छे-े ज ायम वि-ाअ-ुदा-ा तत्वावर शाळा परवा-ाजीची माज्जी जे ली अशाच संस्थां-ा ज ायम वि-ाअ-ुदा-ा तत्वावर शाळा परवा-ाजी देज्यात आली असल्यामुळे त्या शाळां-ा अ-ुदा-ा देज्याचा प्रश-ा उद्भवत -ाही.

श्रीमती संजीवनी रायकर : माननीय सभापती महोदय, कायम विनाअनुदान तत्त्वावरील शाळांच्या संदर्भात आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 51 वर असलेल्या ता.प्र.क्र.5616 ला उत्तर देताना माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, राज्यात शालेय शिक्षणात अद्यापही गळतीचे प्रमाण मोठे आहे. गळतीच्या प्रमाणात शाळा जवळ उपलब्ध नसणे हा एक घटक कारणीभूत असतो. त्यासाठीच कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळांना परवानगी देण्यात येते. हे खरे असले तरी खरे म्हणजे शासनाच्या तिजोरीमध्ये जो खड्डा पडलला आहे तो बुजविण्याचा एक प्रयत्न म्हणूनही आपण या कायम विनाअनुदान तत्त्वावरील शाळांना मान्यता देत आहात. पण त्यामुळे विद्यार्थी संख्या कमी कमी होत चालली आहे. म्हणून या संदर्भात आम्ही जेव्हा शालेय शिक्षण मंत्र्यांसमवेत चर्चा केली होती तेव्हा त्यांनी सांगितले होते की, या शाळा अनुदानीत करण्यास आम्ही सुरूवात करू. विशेषत: दुर्गम भागातील मुलांना लांब अंतरावर शाळांमध्ये जावे लागते, नद्या-नाले ओलांडून त्यांना शाळेत जावे लागते., त्यामुळे मग मुले शाळेत जात नाहीत, शाळेत जाण्यास टाळाटाळ करतात. तेव्हा त्या भागात अनुदानित शाळांना मान्यता द्यावी. मंत्री महोदयांनीनी कबूलही केले होते की, याबाबतचे धोरण शिथिल करण्याचा विचार शासन करील. आणि आता येथे उत्तर देत आहात की, त्यांनी कायम अनुदान तत्त्वावर शाळा मागितली आणि आम्ही ती दिली आहे. पण जेथे शाळाच नाहीत तेथे आपण गरीब मुलांना शिक्षण द्यावे म्हणून तुम्ही काहीच करणार नाही का?

..... एम 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5614 ....

श्री. हसन मुश्रीफ : माननीय सभापती महोदय, उच्च न्यायालयामध्ये जेव्हा हे प्रकरण गेले होते त्यावेळेस शासनाने तेथे सांगितले आहे की, 2000-01 मध्ये विनाअनुदान तत्त्वावर दिलेल्या शाळा आता या वर्षी अनुदान तत्त्वावर येत आहेत. त्या दृष्टीने त्यांचे मूल्यांकन पूर्ण झालेले आहे. ते झाल्यानंतर शासन त्यामध्ये दुर्गम भागातील, आदिवासी भागातील शाळा, अल्पसंख्यांकांच्या शाळा यांना ताबडतोबीने अनुदान देण्याबद्दलचे धोरण शासन आखत आहोत.

श्री. रामनाथ मोते : माननीय सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मला या ठिकाणी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांकडून दोन मुद्यांबाबत माहिती पाहिजे आहे. एक म्हणजे पहिली ते सातवी इयत्तेपर्यंत शिक्षण देणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे आणि त्यामुळे ग्रामीण भागातील, डोंगराळ, दुर्गम भागातील ज्या शाळा असतील त्या कायम विनाअनुदान तत्त्वावर असण्याऐवजी अनुदान तत्त्वावरच शासनाने मान्यता द्यायला पाहिजे. तेव्हा कायम विनाअनुदान तत्त्वावरील अशा भागातील ज्या शाळा असतील त्यांना आपण अनुदान तत्त्वावर मान्यता देणार का ? दुसरे म्हणजे या सभागृहामध्ये 24 मार्चला माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले होते की, बृहत आराखड्यातील ज्या शाळा आहेत, डोंगराळ, दुर्गम, आदिवासी भागातील ज्या शाळा आहत त्या भागातील शाळांचे नाव दिले तर त्यांना अनुदान तत्त्वावर आणण्याचा विचार करू. तर याबाबतीत खरोखरी आपण निर्णय घेणार आहात काय ? असल्यास, किती दिवसात घेणार आहात ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, कायम विनाअनुदान तत्त्वावरील शाळांतील 'कायम' हा शब्द काढून टाकून लौकरात लौकर त्या सर्वच शाळा अनुदानावर आणण्याचा आपला प्रयत्न आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत आहे आणि ती शासनाची जबाबदारी आहे म्हणूनच लौकरात लौकर अशा सर्व शाळा अनुदानावर आणण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत.

श्री. सदाशिवराव पोळ : सभापती महोदय, महाराष्ट्रातील 103 तालुके शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत आहेत. तेव्हा त्या ठिकाणी अनुदान तत्त्वावरील शाळांची सोय लौकरात लौकर उपलब्ध करून दिली जाईल का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे यामध्ये दुर्गम, डोंगराळ भाग सुद्धा त्यात समाविष्ट केला जाईल.

..... एम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्या संस्था स्वेच्छेने विनाअनुदान तत्त्वावर शाळा चालविण्यास पुढे आल्या त्यांना आपण तशा शाळा दिल्या आणि त्यांना आता अनुदान तत्त्वावर आणण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर आपण येथे दिलेले आहे. आता मंत्री महोदयांनी सांगितले की, कोर्टाच्या निर्णयानुसार आता आम्ही त्यांचेबाबतीत देखील निर्णय घेणार आहोत. तर हा कोर्टाचा निर्णय केव्हा आला आणि तो आला असेल तर या उत्तरामध्ये ते का दिले नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, उत्तरामध्ये जे दिले आहे ते बरोबरच आहे. कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळा काढाव्यात म्हणून आम्ही काही त्यांच्याकडे जात नाही तर अशा प्रकारे शाळा काढण्यासाठी आम्ही जेव्हा जाहिरात देतो त्याला प्रतिसाद देऊन या संस्था आपल्याकडे कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळा आम्हाला देण्यात यावी म्हणून मागणी करीत असतात आणि त्यांना त्यातील नियमानुसार शाळा देताना आम्ही अनुदानासाठी केव्हाही मागणी करणार नाही अशा प्रकारचे ॲफिडेव्हिट त्या संस्था देतात. त्यानुसारच हे उत्तर येथे दिलेले आहे. परंतु त्याचा आता विचार करून शासन अप्रगत भागातील, डोंगराळ, दुर्गम भागातील, अल्पसंख्य शाळा असतील त्यांना अनुदान देण्याचे धोरण लौकरात लौकर शासन घेईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळा देण्याचे धोरण जे सरकारने स्वीकारले तेच मुळी अत्यंत वाईट आहे. त्यातून ब्लॅक मेलिंग होते. यातील 'कायम' हा शब्द काढून, 'विनाअनुदानित' असा शब्द लावून बोर्ड लावतात. त्यात नेमणुका करतात आणि पैसे उकळतात. म्हणूनच या कायम विनाअनुदान तत्त्वावरील शाळांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. त्यामुळे ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांच्यावरही विपरित परिणाम होतो. म्हणून हा कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळा देण्याचा धंदा आपण बंद केला पाहिजे. परंतु पाहिजे त्याला, पाहिजे तेव्हा शाळा दिली जाते. ही खैरात वाटण्याचे प्रकार बंद केले जातील का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कायम विनाअनुदान तत्त्वावरील शाळा दिलेल्या आहेत त्यांचा एकदा सर्व्हे करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यादृष्टीने ताबडतोबीने समित्या नेमून त्यांचा सर्व्हे करून, जेथे अशा प्रकारे गैरप्रकार केले जात आहेत त्यांच्याबाबतीत कारवाई केली जाईल, त्या शाळा बंद केल्या जातील. आणि 'कायम' हा शब्द, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांनी ज्याला उल्लेख केला तो कोर्टाचा निर्णय... आता कोर्टाने असे काही म्हटलेले नाही. तर ...

... (यानंतर श्री.जागडे ....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

शासनाची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर या शाळा अनुदानावर आणण्याचा प्रयत्न करु. त्या प्रमाणे शासन या बाबतचा निर्णय घेत आहे. विना अनुदानीत शाळा कशा प्रकारे अनुदानावर येतील याचा निर्णय शासन घेत आहे. लवकरात लवकर या शाळा अनुदानावर आणणार आहोत.

सभापती :प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पूरक विवरणपत्र सादर करणे

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005-2006 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करतो आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भ्ांरतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदींना अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहास शिफारस केली आहे.

सभापती : सन 2005-2006 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. सदरहू खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणांमध्ये ठेवण्यात येत आहेत.

--

आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची सूची सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, दिनांक 12 जुलै 2005 रोजी विधानमंडळास सादर करण्यात आलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रांमध्ये ज्या मागण्या समाविष्ट केलेल्या नाहीत. अशा दिनांक 11 जुलै 2005 पर्यन्तच्या आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची अनुसूची मी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : दिनांक 12 जुलै 2005 रोजी विधानमंडळास सादर करण्यात आलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रांमध्ये ज्या मागण्या समाविष्ट केलेल्या नाहीत. अशा दिनांक 11 जुलै 2005 पर्यन्तच्या आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची अनुसूची सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व इतर वि. प. स. यांनी " दिनांक 28 जून 2005 रोजी शहापूर तालुक्यातील (जिल्हा ठाणे) घाटघर येथील चोंढे विद्युत प्रकल्पावर पावसामुळे डोंगराची कडा कोसळून अंदाजे 12 ते 15 कामगार मृत्युमुखी पडणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : होय.

सभापती : माननीय सदस्य सर्वश्री अनंत तरे व इतर वि. प. स. यांनी "यावर्षी 11 वीच्या प्रवेशासाठी सुमारे 25 ते 30 हजार विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नसणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : होय.

सभापती : माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर वि. प. स. यांनी " शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षकांना 3 जून, 2000 पासून लागू केलेल्या सुधारित वेतनश्रेणी प्रमाणे ग्रामविकास खात्याने अद्यापही वेतनश्रेणी लागू केलेली नसणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या बाबत शासनास निवेदन करण्यास सांगावे.

सभापती : शासनाने निवेदन करावे.

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : होय.

सभापती : माननीय सदस्य सर्वक्षी मधूकर चव्हाण व इतर वि. प. स. यांनी " मुंबई येथील महालक्ष्मी परिसरातील आदर्शनगर मधील 8 ते 9 वस्त्या बेकायदेशीर ताब्यात घेऊन जमीनदोस्त करण्याचा लोखंडवाला बिल्डरने केलेला प्रयत्न, असे करताना दोन महिन्याच्या मुलाचा झालेला दुर्देवी मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

एएसजे) (2.05

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, दादागिरी करुन आणि बेकायदेशीर रित्या बुलडोझरचा वापर करुन या वस्त्या जमीनदोस्त केल्या जात आहेत. तेव्हा दोन दिवसात या बाबतचे निवेदन शासनास करण्यास माननीय सभापती महोदयांनी सांगावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती : या बाबतचे निवेदन दोन दिवसात करण्याबाबत संबंधीत मा.मंत्रिमहोदयांना मी सांगत आहे.

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : होय.

डॉ. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मी आपणाला दालनात भेटून " राज्यातील खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांमधील कर्मचा-यांना गेले 3 महिन्याचे वेतन अतिविलंबाने मिळणे " या विषयाबाबत शासनाला निवेदन करण्यास सांगावे, असे सांगितले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, दालनात भेटून जे सांगितले आहे, त्याचा उल्लेख सभागृहात होणे बरोबर नाही.

डॉ. व्ही. यू. डायगव्हाणे : ठीक आहे. ते शब्द मी मागे घेत आहे. मी जो विषय सांगितला आहे, तो महत्वाचा आहे. गेल्या तीन महिन्यांपासून या शाळांतील कर्मचा-यांचे वेतन होत नाही.

सभापती : नियम 93 अन्वये आपण हा विषय मांडला आहे. याचा अर्थ हा विषय गंभीर आहे. विशेष बाब म्हणून मी या विषयाबाबत शासनाला निवेदन करण्यास सांगत आहे.

--

(यानंतर श्री. सरफरे.....

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

पृ.शी.: नागपूर शहर व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात सुरु असलेली गॅस्ट्रोची लागण.

मु.शी.: नागपूर शहर व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात सुरु असलेली गॅस्ट्रोची लागण यासंबंधी श्री.संजय दत्त यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(मा. सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सांगली येथील मध्यवर्ती कारागृहातील खतरनाक कैद्यांना गांजा पुरविण्यात येणे.

मु.शी.: सांगली येथील मध्यवर्ती कारागृहातील खतरनाक कैद्यांना गांजा पुरविण्यात येणे यासंबंधी श्री. अनंत तरे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय उप मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. व याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"सांगली येथील मध्यवर्ती कारागृहात कैद्यांना गांजा पुरवठा करणाऱ्या टोळीकडून, कारागृहाच्या भिंतीवर गांज्याच्या पुडया काही ठराविक कैद्यांकडे फेकण्यात येत असल्याचा दिनांक 16 जून 2005 रोजीच्या सुमारास सुगावा लागला असता तेथील पोलिसांनी काही व्यक्तींना रंगेहाथ पकडणे, त्यांना तातडीने अटक करण्यात येणे, कारागृहासारख्या बंदिस्त वास्तूत खतरनाक कैद्यांना गांजा पुरविण्यात येणे, ही बाब गंभीर असून असा प्रकार कारागृहात दिवसाढवळया घडत असल्याने जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संताप लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : या ठिकाणी सोबत जोडलेले निवेदन छापावे).

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या राज्यातील जेलमध्ये आपल्याला जे हवे ते सर्व काही मिळते. याचे जीवंत उदाहरण द्यायचे झाले तर ते येरवडा जेलचे देता येईल. त्या जेलमध्ये एका कैद्याने चाकूने दुसऱ्या कैद्याला मारले. इतकेच नव्हेतर जेलमध्ये कैद्यांना दारु, गांजा इत्यादी अंमली पदार्थ सुध्दा मिळतात. महाराष्ट्रातील जेलमध्ये व कोकणातील रत्नागिरीच्या जेलमध्ये सुध्दा या गोष्टी मिळतात. निवेदनात म्हटले आहे की, "सांगली जिल्हा कारागृहाच्या तिन्ही बाजूस लागून झोपडपट्टी, भाजीबाजार व शाळेच्या उंच इमारती आहेत". याचा अर्थ या उंच इमारतीचा आसरा घेऊन हे प्रकार नियमितपणे त्या ठिकाणी चालू आहेत व नियमितपणे त्या कैद्यांना गांजा वगैरे वस्तू पुरविल्या जात आहेत. तेव्हा या इमारतीकडे जाणारा रस्ता आपण कां बंद केला नाही? या प्रकरणात दोन आरोपींना अटक केली आहे. त्या आरोपींनी गांजा कोठून आणला, कशासाठी आणला? याचा आपण तपास केला काय? असल्यास, त्या तपासामध्ये आपल्याला काय आढळले?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : पटवर्धन हायस्कूलच्या टेरेसवर दोन व्यक्ती संशयास्पदरित्या येरझाऱ्या घालीत आहेत असे या शाळेमधून जेलला फोनवर सांगण्यात आले. त्या नंतर जेलच्या सुपरिटेंडेंटने दोन सुरक्षा रक्षकांना पाठवून त्या दोन आरोपींना ताबडतोब अटक केली. व त्यांच्यावर एन.डी.पी.सी. ॲक्टखाली गुन्हा दाखल केला.

श्री. अनंत तरे : या दोन आरोपींना अटक केल्यानंतर त्यांच्यावरील गुन्हयाची नोंद झाली. परंतु त्यांनी हा गांजा कशासाठी आणला? त्यांनी तो कोणाकडून विकत घेतला? याचा आपण तपास केला काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ज्या दोन व्यक्तींना पकडण्यात आले. त्यांच्याकडे 4 पुडया गांजा व ब्लेड मिळाले. शाळेच्या इमारतीच्या टेरेसवर जावून भिंतीच्या पलिकडे त्या पुडया टाकण्यासाठी ते गेले होते.

श्री. अनंत तरे : या आरोपींनी कोणत्या व्यक्तींकडून हा गांजा विकत घेतला याची आपण चौकशी केली आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्यांना अटक केल्यांनंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आणि आता त्यांनी हा गांजा कोठून आणला याची चौकशी सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माझ्या स्पेसिफिक प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. मी प्रश्न विचारला होता की, त्यांच्याकडे गांजा मिळाल्याबद्दल त्यांच्याविरुध्द गुन्हयाची नोंद करुन आपण कारवाई करीत आहात. परंतु त्यांनी हा गांजा कोणत्या व्यक्तींकडून विकत घेतला त्याची चौकशी केली आहे काय? त्यामध्ये काय आढळले आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : तेच सांगितले आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. आणि आता त्यांनी हा गांजा कोठून आणला याबाबतची चौकशी सुरु आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, एक महिना झाला तरी यांची चौकशी पूर्ण होत नाही. हे गुन्हेगार जेलमध्ये आहेत की बाहेर आहेत?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : हे गुन्हेगार आतमध्ये आहेत. त्यांना जामीन दिलेला नाही. त्यांना पोलीस कस्टडी दिली आहे.

श्री. जी. एल. अैनापूरे : सभापती महोदय, हा गांजा पुरविणारे त्या हायस्कूलच्या स्टाफपैकी आहेत काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : हायस्कूलच्या स्टाफपैकी कुणीही नाही. पकडण्यात आलेले आरोपी हे त्याच जेलमधून सुटलेले गुन्हेगार आहेत.

श्रीमती कांता नलावडे : अशाप्रकारे हे लोक हायस्कूलच्या टेरेसवर जातात कसे? त्या शाळेला वॉचमेन असतांना हे लोक टेरेसवर पोहोचतात, आणि त्याच जेलमधून सुटलेले हे दोन कैदी आहेत. याचा अर्थ या शाळेच्या वॉचमेनशी त्यांचे काही तरी संबंध आहेत. अशाप्रकारे नेहमी टेरेसवर जाऊन तिथून पुडया फेकण्याचे प्रकार सर्रास सुरु होते तेव्हा याची आपण चौकशी केली पाहिजे, ती करणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, अशा प्रकारे नेहमीच ते या शाळेच्या टेरेसवर जातात की नाही याचा तपास केलेला नाही. पण त्यादिवशी त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी जेल मध्ये फोन करुन सांगितले की, शाळेच्या टेरेसवर दोन व्यक्ती संशयास्पदरित्या फिरत आहेत. सांगली येथील मध्यवर्ती जेलच्या अजुबाजूला झोपडपट्टी, भाजीबाजार व शाळेच्या ऊंच इमारती आहेत. तेथील दक्षता पथकाला जेलमध्ये अवैध वस्तू आढळल्या. त्या कुठून येतात ? कशा येतात ? असा प्रश्न निर्माण झाला. कदाचित या वस्तू अजुबाजूला असलेल्या शाळेच्या ऊंच इमारतींवरुन जेलमध्ये फेकत असावेत. त्यानुसार तेथील शाळेच्या मुख्याध्यापकांना अशा सूचना दिल्या होत्या की, जर संशयास्पद असे काही आढळून आले तर त्याबाबतीत जेलच्या अधिका-यांना सूचना द्यावी. त्याप्रमाणे या संबंधित शाळेच्या टेरेसवर दोन व्यक्ती संशयास्पदरित्या फिरत असल्याचे आढळून आल्याने त्यांनी जेलमधील अधिका-यांना कळविले आणि त्याप्रमाणे संबंधितांना पकडण्यात आले.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जेलमध्ये संध्याकाळी 6 वाजल्यानंतर बॅरॅक बंद केली जाते आणि सकाळी 6 वाजल्यानंतर उघडली जाते. पण जेलमध्ये सर्व प्रकारचे धंदे चालतात. तेथे गांजा दिला जातो, दारु मिळते. मी उरण येथे झालेल्या आंदोलनाच्या वेळेला 21 दिवस येरवडा जेल मध्ये होतो. त्याठिकाणी रात्रीच्या वेळेला बाई सोडून सर्व गोष्टी मिळतात. तेथे सांगितले जाते की, आम्ही सर्वकाही पुरवू. जेलमध्ये संध्याकाळी 6 वाजल्यानंतर बॅरॅक बंद केली जाते. अशा वेळी दक्षता पथकाला रात्रीच्या वेळी तेथे जाऊन चौकशी करण्यास सांगणार आहात का? आपण कोणत्याही जेलमध्ये गेलात तरी हीच स्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी सांगितले ते खरे आहे की, या जेलमध्ये सर्व गोष्टी मिळतात आणि त्या गोष्टी पुरविण्याचे काम तेथील शिपायापासून, पोलीस इन्स्पेक्टरपासून सर्व अधिकारी करतात. याबाबतीत उच्च पातळीवर चौकशी करुन याचा बंदोबस्त करणार आहात का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जी सूचना केली आहे, ती खरोखरच स्वागतार्ह आहे. संध्याकाळी बॅरॅक बंद झाल्यानंतर दक्षता पथकाला सूचना दिल्या जातील की, त्यांनी संध्याकाळी 6 वाजल्यानंतर तेथे सरप्राईज व्हिजिट द्यावी, म्हणजे तेथे न कळवता व्हिजिट द्यावी. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तेथे दारु, गांजा किंवा इतर गोष्टी मिळतात. त्यामध्ये तेथील कर्मचा-यांचा, सुप्रीटेंडचा किंवा तुरुंग अधिका-यांचा हात असेल तर त्यांची निश्चितपणे चौकशी करुन त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे की, जेलच्या आवाराभोवती ऊंच इमारती आहेत. यापूर्वी या जेलमधून काही कैदी पळून गेले आहेत. ही जागा कैद्यांना ठेवण्यासाठी योग्य नाही असे तेथील जेलरचे मत आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने आमच्यावर वेळोवेळी जेलमध्ये जाण्याचा प्रसंग येतो. तेव्हा पर्यायी जागा शोधून दुसरी जेल बांधण्याची योजना देखील तेथील जेलरने आणि अधिका-यांनी शासनाकडे पाठविलेली आहे. यापुढे असे प्रकार घडू नयेत यासाठी स्वतंत्र जेलची इमारत बांधण्याच्या प्रस्तावावर विचार करुन शासन याबाबतीत त्वरित निर्णय घेईल का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, तेथील जेल मध्यवर्ती ठिकाणी, गजबजलेल्या वस्तीत असल्यामुळे असे प्रकार वारंवार घडत आहेत, त्यामुळे जेल गावाच्या बाहेर असावी असा प्रस्ताव जेलच्या महानिरीक्षकांकडून आलेला आहे. यासाठी 20 एकर जागेची मागणी केली आहे. तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे आणि लवकरात लवकर यावर कारवाई केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, संध्याकाळी 6 वाजल्यानंतर बॅरॅक बंद झाल्यावर दक्षता पथकाला सरप्राईज भेट देण्यास सांगितले जाईल. साधारणपणे जेलचे नियम असतात. आम्ही देखील अनुभवले आहे आणि इमर्जन्सीच्या काळामध्ये ठाणे मध्यवर्ती कारागृहामध्ये असताना आम्ही पाहिले आहे की, जेलमध्ये येणा-या प्रत्येक व्यक्तीची मुख्य दरवाजावर झडती घेतली जाते. मग तो कैदी असेल, तेथील कर्मचारी असेल किंवा व्हिजीटर असेल. पण तेथील जेलच्या पोलिसांची झडती घेतली जात नाही. जेलमध्ये गांजा, दारु किंवा अन्य ज्या काही वस्तू जातात, त्या खरे म्हणजे या पोलिसांच्या माध्यमातूनच जातात हे मी प्रत्यक्षपणे माझ्या डोळ्यांनी पाहिलेले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत पत्र/शोधनीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू...

गेटमधून पोलीस बाहेर जातात. ज्यांची त्या ठिकाणी डयुटी असते, त्यांच्या माध्यमातून या सगळया गोष्टी आत पोहोचविल्या जातात. जेलमध्ये दरवाजातून प्रवेश करणाऱ्या ज्या व्यक्ती असतात, त्यांची छाननी करूनच त्यांना जेलमध्ये प्रवेश दिला जाईल असा नियम करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर साहेबांनी जी सूचना केली ती अगदी बरोबर आहे. बाहेरच्या व्हीजिटरांचे चेकिंग करुन त्यांना आत सोडले जाते. परंतु जे कर्मचारी असतात त्यांचे जेलमध्ये जातांना चेकिंग होत नाही. म्हणून असे प्रकार थांबविण्यासाठी पुढील काळात पोलीस कर्मचारी किंवा जेलचे कर्मचारी असतात, त्यांचे चेकिंग करुनच त्यांना सोडले जाईल असा नियम केला जाईल.

श्री.जी.एल.अैनापुरे : मी सांगली जिल्ह्यातील आहे त्यामुळे मला त्या ठिकाणच्या जेलमधील कैद्यांची टॅक्टीक्स माहीत आहे. तेथील कैदी सरळ सरळ बाहेर येतात आणि स्टेशनवर आपल्याला भेटायला आलेल्या नातेवाईकांना सोडायला जातात आणि तेथूनच जेवण करून येतात. शाळेच्या भिंतीवरून उडी मारून ते बाहेर जातात. त्या ठिकाणची भिंत उंच तरी करावी किंवा त्या भिंतीववर काटेरी कुपन तरी करावे, अशाप्रकारचा उपाय केला तर बंदी घालता येईल, अडथळा आणता येईल, असे करता येईल काय ? कैदी शाळेच्या भिंतीवरून उडी मारुन बाहेर येतात किंवा भिंतीवर उभे राहून दुसऱ्या कोणाला तरी पैसे देऊन काही गोष्टी ते आणून घेतात. याबाबत तेथील पोलिसांना सांगितले तर ते म्हणतात आम्ही काय करू शकतो ? काही करू शकत नाही. काही ठिकाणची शासन यंत्रणा हेल्पलेस झालेली आहे, काही ऐकत नाही. या जेलच्या संदर्भाने काही वेगळी उपाययोजना आपण तात्काळ करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी मघाशी सांगितलेले आहे की, तेथील जागा ही बरोबर नाही. नव्याने जेल करण्याच्या दृष्टीने गावाच्या बाहेर 20 एकर जागेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.अनंत तरे : अत्यंत गंभीर बाब आहे. जेलमध्ये मोबाईल फोन, स्टेनगन, रिव्हॉल्व्हर घेऊन येतात. आरोपी जेलमध्ये मोबाईलवरून संपर्क करत असतात. जेलमध्ये सगळी व्यवस्था असते, जेलमध्ये राहून ते सगळे धंदे चालू ठेवतात. प्रश्न असा आहे की, ही अत्यंत गंभीर बाब समजून अशा जेलमध्ये मोबाईल फोन, हत्त्यारे सापडतील त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय ? ज्या जेलमध्ये अशाप्रकारच्या वस्तू सापडतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (पुढे चालू...

त्या जेलच्या जेलरवर ताबडतोब कारवाई केली जाईल काय ? त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य पाटील साहेब म्हणाले त्याप्रमाणे रॅन्डम चेक करण्याची तरतूद केली जाणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : नाशिक जेलमध्ये जो प्रकार झाला, त्यानंतर तुरुंग अधिकारी किंवा तुरुंग अधिक्षक यांच्या संबंधाने आदेश काढलेले आहेत की, त्यांनी महिन्यातून एकदा आपल्या जेलमध्ये कोणतीही आक्षेपार्ह वस्तू नाही, अशाप्रकारे अफिडेव्हीट करुन द्यावे. त्यानंतर त्या जेलमध्ये काही आक्षेपार्ह वस्तू आढळून आली तर त्यांना त्याच क्षणी जागेवर सस्पेंड केले जाईल.

--

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/

पृ. शी. : ऐन बारावीच्या निकालाच्यावेळी तंत्र शिक्षण संचालनालयाने विनाअनुदानित खाजगी अभियंत्रिकी महाविद्यालयातील बी.ई.प्रथम वर्षाच्या जागांमध्ये केलेली कपात.

मु. शी : ऐन बारावीच्या निकालाच्यावेळी तंत्र शिक्षण संचालनालयाने विनाअनुदानित खाजगी अभियंत्रिकी महाविद्यालयातील बी.ई.प्रथम वर्षाच्या जागांमध्ये केलेली कपात, यासंबंधी सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान, सर्वश्री विनायकराव मेटे, वसंतराव काळे, रणजितसिंह मोहिते-पाटील, सदाशिवराव पोळ, जितेंद्र आव्हाड, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्री.नतिकोद्दीन खतिब, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, संजय दत्त, सुधीर सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" ऐन बारावीच्या निकालाच्या वेळी राज्य शासनाच्या तंत्र शिक्षण संचालनालयाने राज्यातील विना अनुदानित खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयातील बी.ई. प्रथमवर्षाच्या 5 हजार जागांची केलेली कपात, यामध्ये मराठवाडयातील 18 महाविद्यालयांतील सुमारे 1875 जागा कमी होणे, जागा कमी झाल्यामुळे शैक्षणिक शुल्कात भरमसाठ वाढ होण्याची निर्माण झालेली शक्यता, परिणामी पालक व विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली नाराजी, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.सुरेश शेट्टी (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान : सभापति महोदय, मंत्री महोदय ने निवेदन में यह कहा है कि करीब 5 हजार जगह कम की गई है, जिनमें 1650 जगह मराठवाड़ा की है. इस निवेदन में यह भी कहा गया है कि जिन संस्थाओं ने अपनी संस्थाओं की कमियों को पूरा कर लिया है उनकी जगह पूर्ववत कर दी गई है, जिनमें मराठवाड़ा के इंजीनियरिंग कॉलेजेस की 705 जगहों का समावेश है. मैं यह पूछना चाहती हूं कि, यह अच्छी बात है कि, उन संस्थाओं की सीटें पूर्ववत कर दी गई है. लेकिन जिन संस्थाओं ने मॅनेजमेंट कोटे के अन्तर्गत हजारों रुपये फीस ले करके विद्यार्थियों को प्रवेश दिया था लेकिन नार्म्स की पूर्ति न करने के कारण उन्हें कोर्स बंद करना पड़ा था, जिसके कारण विद्यार्थियों का नुकसान हुआ था, तो ऐसी संस्थाओं के खिलाफ शासन क्या कार्रवाई करेगा, क्या उन संस्थाओं से रिकवरी की जाएगी ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि, सुना है कि इंजीनियरिंग कॉलेजेस में बहुत सारी जगह रिक्त रहती है. इसका क्या कारण है ? मेरे अपने स्कूल में ही तीन इंजीनियर टीचर के रुप में काम कर रहे हैं. ऐसी स्थिति में इन इंजीनियरों को सेल्फ एम्पलायमेंट के जरिए टेक्नीकल रिसोर्स मिल सके, इस हेतु इस दिशा में क्या शासन की ओर से कोई कदम उठाया जाएगा ? जिस तरह से मेडिकल के स्नातकों को कम ब्याज पर कर्ज मिलता है, उसी तरह से इंजीनियरिंग कॉलेज के विद्यार्थियों को उपयुक्त प्रोजेक्ट के लिए वित्तीय सुविधा, काउण्टर गॉरण्टी, अश्युअर्ड मार्केट इत्यादि सुविधा मुहैया कराने के संबंध में तथा इंजीनियरिंग तथा टेक्नीकल क्षेत्र में सेल्फ एम्पलायमेंट जनरेट करने के लिए क्या शासन की तरफ से कोई कदम उठाए जाएंगे ?

श्री सुरेश शेट्टी : सभापति महोदय, सम्माननीय सदस्या ने यह प्रश्न पूछा है, कि जो संस्थाएं या कॉलेजेस AICTE के नार्म्स पूरा नहीं करेंगे, उनके खिलाफ क्या कार्रवाई की जाएगी. मैं इस संबंध में यह बताना चाहता हूं कि AICTE द्वारा इंसपेक्शन करने के बाद जब यह पता चला कि संस्थाओं ने नार्म्स पूरे नहीं किए हैं, जैसे स्टाफ, इन्फ्रास्ट्रक्चर इत्यादि नार्म्स के अनुसार नहीं है, तो ऐसी संस्थाओं के खिलाफ कार्रवाई की गई है. ऐसे कॉलेजों की सीटें कम की गई है. कुछ कॉलेजों को नोटिस दी गई थी. नोटिस देने के बाद जिन कॉलेजों ने कमियों को पूरा कर लिया था, उन कॉलेजों को AICTE ने दोबारा इंसपेक्शन करके उनकी जगह पूर्ववत कर दी है. सम्माननीय सदस्या ने यह भी पूछा है कि इंजीनियरिंग कॉलेजों में जगह रिक्त क्यों रहती है.

...2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री सुरेश शेट्टी.....

मैं इस संबंध में यह बताना चाहता हूं कि बहुत सारी संस्थाओं ने नये कॉलेजेस शुरु करने के लिए परमीशन मांगी थी, जिन्हें परमीशन दी गई. इस प्रकार से पिछले शैक्षणिक सत्र में इन संस्थाओं में 46869 कुल सीटें थीं. इनमें 7400 सीटें रिक्त रहीं. इसमें डिमांड एंड सप्लाय का सिम्पल केलकुलेशन है. डिमांड कम थी और सीटें ज्यादा हो गई थी इसलिए सीटें रिक्त रही. दूसरी बात यह है कि जो अच्छी संस्थाएं हैं, जिन कॉलेजों में पर्याप्त स्टाफ, लाईब्रेरी, प्रयोगशाला इत्यादि चीजों की बेहतर सुविधा है, तो यह स्वाभाविक है कि विद्यार्थी ऐसे कॉलेजों में ही दाखिल होना चाहेगा. इसलिए यह स्पष्ट है कि जो संस्थाएं नार्म्स के अनुसार कार्य नहीं करती है, वहां विद्यार्थी प्रवेश नहीं लेना चाहते हैं. ऐसी संस्थाओं को हम सपोर्ट नहीं करेंगे. जिन संस्थाओं में कमियां है, उनके खिलाफ तुरन्त कार्रवाई करेंगे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मराठवाडयातील अभियांत्रिकी आणि इंजिनियरींग कॉलेजेसच्या विषयात मी अत्यंत अधिकारवाणीने सांगू शकतो.मराठवाडयातील 12 ते 14 कॉलेज्स मध्ये .....

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकात जोशी ....

फक्त शासनाच्या व्यवहारशून्य धोरणामुळे मराठवाडयातील तरुणांची संपूर्ण फळीच्या फळी उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. मी एक उदाहरण देतो. उदगीरला शामलाल इंजिनिअरींग कॉलेज आहे. श्री. शामलालजी आर्य हे मराठवाडा मुक्ती संग्रामात लढले. त्यांनी सुरु केलेले हे इंजिनिअरींग कॉलेज आहे. त्या ठिकाणी 450 विद्यार्थी शिकत होते. संस्था चालकांनी एकदम कॉलेज बंद करुन टाकले. तेथील विद्यार्थी रस्त्यावर आले. 150 प्राध्यापक उपोषण करतात पण शासनाचा प्रतिनिधी त्यांना भेटावयास गेला नाही. आपल्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम यांचे जे.एन. इंजिनिअरींग कॉलेज आहे. त्या ठिकाणी 9 महिन्यांपासून प्राध्यापकांना पगार मिळालेला नाही. त्या ठिकाणी संस्था पगार देत नाहीत. प्राध्यापकांची बाहेर बोलण्याची हिंमत नाही. बोलाल तर याद राखा अशी परिस्थिती आहे. मी ए.आय.सी.टी.ई.च्या सर्व सदस्यांना भेटलो. त्यांना सांगितले की, मराठवाडयाच्या कॉलेजच्या सिट्स कमी करु नका. हा टेम्परारी गॅप आहे. अमेरिकेमध्ये आज सुध्दा 50 हजार पेक्षा जास्त सॉफ्टवेअर इंजिनिअर्सची गरज आहे. सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी सांगितले की, इंजिनिअर टिचिंगचे काम करीत आहेत. बी.एस्सी., बी.ए. झालेल्यांपेक्षा ते अधिक इंटेलेक्चुअल असतात. या इंजिनिअरींग कॉलेजेसनी फी घेतलेली आहे. या कॉलेजेसनी 40 ते 45 हजार रुपये फी घेतली. मग प्राध्यापकांना पगार का दिला नाही ? त्या ठिकाणी फॅकल्टी बेसीसवर सिट्स कमी केल्या. त्या ठिकाणी फॅकल्टीज का मिळत नाहीत. मराठवाडयातील 200 चांगल्या फॅकल्टीज कर्नाटक आणि आंध्रप्रदेशमध्ये गेल्या. संस्था चालकांनी स्वत:कडे पैसे ठेवले, इमारती बांधल्या, मुलींचे लग्न केले परंतु एकाही प्राध्यापकाला पगार दिला नाही. त्यांच्यावर ॲक्शन घेणार काय ? या प्राध्यापकांचा पगार चेकने देणार काय ? शिक्षकांच्या पगाराच्या संदर्भात या ठिकाणी शिक्षक प्रतिनिधी मुद्दे मांडतात. सर्व इंजिनिअरींग कॉलेजच्या प्राध्यापकांचा पगार चेकने देण्याचे संस्था चालकांना कंपल्सरी करणार काय ? दुसरा प्रश्न असा की, विद्यार्थ्यांची संख्या कमी असण्याचे एक कारण म्हणजे त्यांना रोजगार मिळत नाही. आपण सरकारी नोकऱ्या बंद केल्या. डॉक्टर्सना ज्याप्रमाणे एक वर्षाची इंटर्नशीप असते त्याप्रमाणे इंजिनिअर्सना सहा महिने...

सभापती : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या प्राध्यापकांचा पगार चेकने देण्याचे बंधन संस्था चालकांवर आणणार काय ? दुसरे म्हणजे त्यांना एम्प्लायमेंट मिळण्यासाठी इंजिनिअर झाल्यानंतर किमान सहा महिन्याचे एम्प्लायमेंट जर दिले, एक वर्षाचे प्रोबेशन पिरियड यासारखे कंपल्सरी केले तर इंजिनिअरींग कॉलेजेसमध्ये मोठया प्रमाणावर विद्यार्थी शिकावयास येतील. या दोन प्रश्नांच्या बाबतीत कायद्याने त्यांच्यावर बंधन आणणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : चेकने पमेंट करणार काय असा पहिला प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. जे शासनाचे कॉलेजेस आहेत किंवा संस्था आहेत त्या ठिकाणी आम्ही चेकने पेमेंट करतो. ज्या विनाअनुदानित संस्था आहेत त्या ठिकाणी असा काही नियम करावयाचा असेल तर ते करण्याची तयारी आहे.

श्री. श्रीकांत जोशी : ते किती दिवसात करणार ?

श्री. सुरेश शेट्टी : लगेच करु. त्यामध्ये काही अडचण नाही. सन्माननीय सदस्यांनी शामलाल इंजिनिअरींग कॉलेजचा उल्लेख केला. शामलाल इंजिनिअरींग कॉलेजने स्वत:हून ए.आय.सी.टी.ई. कडे अर्ज देऊन आपल्या सिट्स कमी करुन घेतल्या. त्यांच्या सिट्स पूर्ण भरत नव्हत्या. त्यांनी ए.आय.सी.टी.ई.कडे अर्ज करुन 240 सिट्स कमी करुन घेतल्या. दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्यांनी ॲप्रेटीसशीपच्या बाबतीत सांगितले. त्यावर आपण विचार करु.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मुंबई, पुण्यासह विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सुमारे 5 हजार जागा कमी केल्या होत्या. मला असे विचारावयाचे आहे की, मुंबईतील एकूण किती जागा कमी झाल्या ? तसेच मुंबईतील कोणकोणत्या महाविद्यालयातील प्रत्येकी किती जागा कमी झाल्या आहेत ? मराठवाडयातील 1650 जागा कमी झाल्या होत्या. परंतु त्यांनी मानकांची पूर्तता केल्यानंतर मराठवाडयातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील 705 जागा पूर्ववत केलेल्या आहेत. तशा मुंबईतील किती जागा पूर्ववत केल्या गेल्या ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्याजवळ संपूर्ण यादी आहे, ती मी पटलावर ठेवतो.

श्रीमती फौजीया खान :सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने मेरे प्रश्न के संबंध में यह उत्तर दिया कि जिन संस्थाओं ने नार्म्स की पूर्ति नहीं की थी, उनके खिलाफ कार्रवाई के तौर पर उनकी सीटें कम कर दी गई थी. लेकिन मैंने यह भी पूछा था कि, मॅनेजमेंट ने फीस के रुप में जो हजारों रुपये लिए हैं, क्या वे उनसे रिकवर किए जाएंगे ? दूसरा प्रश्न मैंने यह पूछा था कि जो रिक्त जगह रहती है, उसके संबंध में शासन को यह सोचना जरुरी है कि ये जगह रिक्त क्यों रह जाती है. क्या इसका कारण एम्पलायमेंट और सेल्फ एम्पलायमेंट नहीं मिलना है ? अगर यह सही है तो क्या शासन द्वारा टेक्नोक्रेटस, बँकर्स और जनप्रतिनिधियों का एक स्टडी ग्रूप बनाकर उसके माध्यम से टेक्नीकल शिक्षा के बारे में स्टडी की जाएगी ताकि इसमें कोई मार्ग निकल सके ? यह बहुत गंभीर विषय है, ऐसा मैं समझती हूं.

श्री.सुरेश शेट्टी :सभापति महोदय, मैं पहले ही इसका उत्तर दे चुका हूं. जो विद्यार्थी पिछले साल प्रवेश ले चुके हैं यानी जो पिछले साल फर्स्ट ईयर में थे और इस साल सेकंड ईयर में है, उन विद्यार्थियों पर संस्थाओं के खिलाफ की गई कार्रवाई से कोई परिणाम नहीं होगा. यह निर्णय इस साल के प्रवेश के संबंध में है. जैसे पिछले साल जहां 100 सीटें दी गई थी, वहां कहीं 50 सीटें, कहीं 40 सीटें कम की गई है. लेकिन अगर इस साल यानी चालू शैक्षणिक सत्र के लिए इसके पहले ही किसी विद्यार्थी से फीस ली गई होगी तो वह वापस लेने के लिए विभाग की ओर से, शासन की तरफ से इस संबंध में कार्यवाही की जाएगी.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभापती : आपल्याला पूरक प्रश्न विचारावयाचा असल्यास मी परवानगी देईन, परंतु हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी देणार नाही.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दिनांक 30.6.2005 रोजी महाराष्ट्र शासनाने सर्व संस्थांना किती जागा कमी केल्या आहेत ते कळविलेले आहे. त्यापूर्वी ज्या संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असेल आणि फी वसूल केली असेल त्याबाबत शासनातर्फे खात्री केल्यानंतर ते पैसे विद्यार्थ्यांना परत मिळतील. दुसरा प्रश्न मा.सदस्यांनी जागांबाबत विचारला आहे. मैं इस संबंध में यह कहना चाहता हूं कि, कुछ कॉलेजों ने कुछ कोर्सेस ऐसे चालू किए थे, जिनकी अभी बिल्कुल मांग नहीं है. दो साल पहले आय.टी. और इलेक्ट्रॉनिक कोर्स के अन्दर डिमांड नहीं थी लेकिन इस साल हर विद्यार्थी आय.टी. और इलेक्ट्रॉनिक के कोर्स में प्रवेश लेना चाहता है. इस साल मॅकेनिकल और इलेक्ट्रिक के कोर्स में प्रवेश के लिए विद्यार्थी कम संख्या में आ रहे हें. तात्पर्य यह है कि बहुत सारी संस्थाओं ने इतने सारे कोर्सेस चालू कर रखे हैं, जिनकी आज कोई मांग नहीं है. तो ऐसी स्थिति में वहां वेकेन्सी होना स्वाभाविक है. इसमें हम कुछ नहीं कर सकते है.

श्री.सागर मेघे : सभापती महोदय, शासनाने महाविद्यालयांमध्ये ए, बी, सी असे ग्रेडेशन पध्दत सुरु केली होती. त्यामुळे कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावयाचा याबाबत विद्यार्थ्यांचा कल दिसून येत होता. ही पध्दत सध्या सुरु आहे काय ? नसल्यास ती पुन्हा सुरु करणार आहे काय ? एआयसीटीने जागा कमी केल्या होत्या. त्यासाठी त्यांनी 4 जुलैपर्यंत मुदत देऊन संस्थांना कळविले होते की, तुमच्या ज्या त्रुटी असतील त्याबाबत पाठपुरावा करावा, आम्ही यासंबंधी निर्णय घेणार आहोत. एआयसीटीकडून ज्यांच्या जागा वाढल्या आहेत त्यांना परवानगी देऊ. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, एआयसीटीकडून ज्यांना परवानगी मिळाली आहे, त्याबाबत शासनाची काय भूमिका राहणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : ग्रेडेशनची पूर्वीची पध्दत सुरु आहे, ती बंद केलेली नाही. ज्यांना एआयसीटीकडून परवानगी असेल त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे आम्ही परवानगी देणार आहोत.

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. एन.पी. हिराणी : ज्या अभियांत्रिकी कॉलेजेसना मान्यतेची गरज आहे त्या कॉलेजेसचे संस्थाचालक ऐआयसीटीकडे अर्ज करतात. हे अर्ज केल्यानंतर तपासणी होते. परंतु असे लक्षात आलेले आहे की, तिच तिच कॉलेजेस डिफॉल्टर होताना दिसतात. यावर्षी मान्यता मिळविण्यासाठी काही तरी थातूरमातूरपणे त्रुटी पूर्ण केल्या जातात. पुन्हा पुढील वर्षी त्याच त्रुटी असतात. अशा त-हेने विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळण्याचा प्रकार उच्च शिक्षणामध्ये विशेषत: अभियांत्रिकी कॉलेजेसमध्ये चाललेला आहे. तेव्हा शासन क्रॉनिक डिफाल्टरांची यादी तयार करुन ती ऐआयसीटीकडे देऊन डिफॉल्टरांविरुध्द दंडात्मक कारवाईची शिफारस करणार आहे काय ? या वर्षी शासनाने वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी कॉलेजेसच्या फी रिव्हाइज केल्या. त्यामुळे सदर फी प्रमाणे विद्यार्थ्यांकडून पैसे घेणे अभिप्रेत आहे. परंतु असे लक्षात आलेले आहे की, जी वाढीव फी विद्यार्थ्यांनी मागील वर्षी दिलेली होती त्याप्रमाणे या वर्षी देखील वाढीव फी विद्यार्थ्यांकडून घेतली जात आहे. विद्यार्थ्यांकडून बॅक डेटेड फी वसूल केली जात असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष पसरलेला आहे. यासदर्भात त्यांनी स्ट्राईक देखील केलेला आहे. तेव्हा बॅक डेटेडने वाढीव फी घेण्याचे अधिकार शासनाने कॉलेजेसना दिलेले आहेत काय ?

श्री. सुरेश शेट्टी : यासंदर्भात संस्था चालकांविरुध्द ॲक्शन घ्यावयाची आहे. याबाबतीत माननीय सदस्यांनी स्वत: पुढाकार घ्यावयास पाहिजे. आता मा. मुख्य मंत्री महोदयांच्या दालनामध्ये इंजिनिअरिंग आणि मेडिकल फीच्या संदर्भात चर्चा होणार आहे. मा.सदस्यांनी जी सूचना केली त्याप्रमाणे ठोस कारवाई करण्याची आमची तयारी आहे. परंतु नंतर कोणी मा.सदस्यांनी अशी ॲक्शन घेऊ नका असे सांगता कामा नये. फीच्या संदर्भात जो काही निर्णय होईल तो मी सदनाला सांगेन.

श्री. जी.एल.ऐनापुरे : अभियांत्रिकी कॉलेजेस किंवा प्रोफेशनल कोर्सेसच्या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय गोंधळलेल्या अवस्थेत आहे. अधिका-यांत एकमत नाही. ज्यांना कॉलेजेस दिली जातात त्यांची पात्रता पाहिली जात नाही. साध्या चिठ्ठीवर मेडिकल आणि इंजिनिअरिंग कॉलेजेस दिलेली आहेत. ज्यांनी ही कॉलेजेस दिलेली आहेत ते ती चालविण्यास योग्य आहेत काय हा प्रश्न आहे. खरे म्हणजे जमिनी मिळविण्यासाठी ही कॉलेजेस काढलेली आहेत. आता कॉलेजेसमध्ये त्रुटी ठेवून मान्यता काढून घ्या असे अर्ज ते करतील आणि त्यांच्या पदरात जमीन पडेल. ज्यांची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जी.एल.ऐनापुरे...)

इंजिनिअरिंग कॉलेजेस जास्त झालेली आहेत त्यांना पुन्हा इंजिनिअरिंग कॉलेजेस काढण्यास परवानगी द्यावयाची नाही असे धोरण शासन स्वीकारणार आहे काय ? तसेच बी.एड्. कॉलेजेस, इंजिनिअरिंग कॉलेजस, मेडिकल कॉलेजेसच्या फी आणि प्रवेशाच्या संदर्भात शासन एकच धोरण ठरविणार आहे काय ? तसेच फी नियंत्रण, प्रवेश नियंत्रण समितीपुढे शासन आपले धोरण स्पष्ट करील काय ? तसेच पात्रता तपासूनच इंजिनिअरिंग, मेडिकल, बी.एड्.कॉलेजेस काढण्यास परवानगी देण्यात येईल काय ?

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडे अशा प्रकारच्या स्फेसिफीक केसेस असतील तर त्याबाबाबतची माहिती माझ्याकडे द्यावी. त्या केसेस तपासून घेऊन त्या अनुषंगाने कारवाई केली जाईल. सभापती महोदय, "फी" फिक्सेशन आणि "ॲडमिशन प्रोसेस" यासाठी दोन समित्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. सुप्रीम कोर्ट आणि हायकोर्ट यांच्या आदेशाप्रमाणे "फी" फिक्सेशन झालेले आहे. यामध्ये शासनाचा कोणत्याही प्रकारचा रोल नाही.

श्री. जी.एल.अैनापूरे : सभापती महोदय, यामध्ये शासनाचा रोल महत्वाचा आहे. मी याबाबतीत स्वत: बाजू मांडण्यासाठी गेलो होतो त्यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शासनाची अशा प्रकारची भूमिका आहे. फी नियंत्रण समितीने सांगितले, प्रवेश नियंत्रण समितीने सांगितले, त्यावेळी शासनाचे वकील सुध्दा उपस्थित होते, त्या ठिकाणी श्री.एस.ए.पठाण, संचालक हे देखील उपस्थित होते. या सर्व लोकांनी त्यावेळी सांगितले की, शासनाचे यासंबंधी धोरण ठरलेले आहे. त्याप्रमाणे आम्ही हे मान्य केलेले आहे. याबाबतच्या दुस-या बैठकीत याच लोकांनी सांगितले की, शासनाचे अशा प्रकारचे धोरण नाही. रविवारी सकाळपर्यन्त ज्या समितीने विशिष्ट संस्थांच्या बाबतीत निर्णय दिला आणि तो निर्णय समितीने दुपारी 1.00 वाजता नाकारला. त्यांनी सांगितले की, याबाबतचा निर्णय सकाळी 10.00 वाजताच झालेला आहे. यावेळी शासनाच्या लोकांनी लागलीच निर्णय फिरविला. तो निर्णय फिरविण्याची गरज होती काय ? यासंदर्भात काही देवाण घेवाणीचे काम चालले आहे काय अशा प्रकारचा संशय येण्याची शक्यता आहे. म्हणून याबाबतीत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : फी फिक्सेशन ही इंडिपेंडंट ॲटॉनॉमस कमिटी आहे व या कमिटीवर कोर्टाचे सुपरव्हिजन आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे ही कमिटी काम करीत असते. यामध्ये सरकारची कोणत्याही प्रकारची इन्व्हालमेंट नाही. आमच्या विभागाचे सचिव सरकारचे प्रतिनिधी म्हणून आहेत. या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या काही सजेशन्स असतील तर त्यासंबंधी विचार केला जाईल.

सभापती : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रथम मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.तुमच्या मनात ज्या अपेक्षा असतील त्या सर्व अपेक्षा मंत्री महोदय पूर्ण करु शकणार नाहीत.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे दुपारी 3.00 वाजता बैठक आयोजित केलेली आहे. या बैठकीस सन्माननीय सदस्यांनी उपस्थित रहावे अशी माझी विनंती आहे. त्या बैठकीत आपले काय म्हणणे आहे ते पूर्णपणे ऐकून घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी उत्तर दिलेले आहे की, महाराष्ट्रात वेगवेगळया विभागात अशा प्रकारचे 18 महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयातील एकंदर 1650 जागा कमी होणार आहेत. सभापती महोदय, याच सभागृहामध्ये स्वायत्त विद्यापीठाचे विधेयक मांडण्यात आलेले आहे. या विधेयकाच्या बाबतीत दोन्ही बाजुच्या सदस्यांनी चर्चा केलेली आहे. ते विधेयक आता संयुक्त समितीकडे पाठविण्यात आलेले आहे. याच पार्श्वभूमीवर आज या महाराष्ट्रामध्ये खाजगी विद्यापीठांच्या माध्यमातून सरकारने ज्या पध्दतीने त्या संस्थांना रॅनसम दिलेल्या आहेत. कोणत्याही प्रकारची खातरजमा न करता या संस्थांना शासनाने परवानग्या दिलेल्या आहेत. त्याचा परिणाम असा झाला आहे की, आज महाराष्ट्राच्या निरनिराळया भागामध्ये संस्था सुरु झालेल्या आहेत. परंतु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविल्या जात नाहीत. तरी देखील त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून पूर्णपणे फी घेतली जात आहे. परंतु त्या विद्यार्थ्यांना योग्य प्रकारचे शिक्षण दिले जात नाही. सभापती महोदय, 18 शिक्षण महर्षी यांची यादी मंत्री महोदयांकडे असली तर ती सभागृहासमोर ठेवावी. हे शिक्षण महर्षी कोण आहेत हे सभागृहाला आणि महाराष्ट्रातील लोकांना समजू द्या. या शिक्षण महर्षी यांच्या संस्थांना शासनाने परवानगी दिलेली आहे. परंतु त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयी-सुविधा दिल्या जात नसताना विद्यार्थ्यांकडून पूर्णपणे फी घेतली जात आहे. म्हणून माननीय मंत्र्यांनी या शिक्षण महर्षी यांची नावे सभागहात सांगावी. दुसरे असे की, अशा संस्थांमधील विद्यार्थ्यांकडून फी घेतली गेलेली आहे व या प्रक्रियेमुळे या विद्यार्थ्यांना या संस्थांमध्ये प्रवेश मिळाला नाही त्या विद्यार्थ्यांना त्यांची फी परत दिली जाणार आहे काय ? अशा संस्थांवर कारवाई करण्याची यंत्रणा शासनाकडे उपलब्ध आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, या संस्थांची यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे. या संस्था चालकांची नावे आता माझ्याकडे नाही, त्यामुळे ती नावे मी उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवतो. सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थ्यांकडून सदर संस्थांनी फी घेतलेली आहे ती परत केली जाईल काय या अनुषंगाने दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या संदर्भात स्फेसिफीक संस्थेच्या बाबतीत तक्रार केली तर त्याबाबतची चौकशी करण्यात येईल व

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल. यासंदर्भात आम्ही वृत्तपत्रात जाहिरात देऊ व ज्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी येतील त्या तक्रारींची गंभीर दखल घेऊ...

श्री. पांडुरंग फुंडकर : या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला नाही तर त्या विद्यार्थ्यांची फी परत करण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : या संबंधी स्फेसिफीक तक्रार प्राप्त झाली तर आम्ही त्या बाबतीत तात्काळ दखल घेऊ.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संदर्भातील उत्तरामध्ये राज्याची गरज लक्षात घेऊन डिमांड आणि सप्लाय असा शब्द वापरला आहे. सभापती महोदय, सर्व सोयी प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांकडे विद्यार्थ्यांचा कल मोठया प्रमाणात आहे. ज्या महाविद्यालयांमध्ये सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा नाहीत त्या ठिकाणी विद्यार्थी प्रवेश घेण्यास मागे पुढे पाहतात, म्हणून त्यांना इंटेक मिळत नाही.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK 2.50

लक्षवेधी सूचना क्र 3 पुढे सुरु...

प्रा.जोगेंद्र कवाडे...

अेआयसीटीई ने हाच मुद्दा लक्षात घेऊन राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील हजारो जागा कमी केल्या. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारा प्रशिक्षित शिक्षक वर्ग आणि पायाभूत सुविधा जी महाविद्यालये उपलब्ध करुन देत नाहीत त्यांना शासनाने परवानगी का द्यावी ? अशी परवानगी दिली असेल तर अेआयसीटीई ने कारवाई करण्याच्या पूर्वीच शासन या महाविद्यालयांवर कारवाई करणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मा. सदस्य डॉ. हिराणी यांनी विचारल्याप्रमाणे फी वाढीचा जो निर्णय घेण्यात आला तो ज्या वर्षात घेण्यात आला त्या वर्षापासून लागू आहे. परंतु महाविद्यालये पूर्वलक्षी प्रभावाने फी वाढ वसूल करीत आहेत. याबाबत संबंधित महाविद्यालयांनी शासनाची तशी परवानगी घेतली आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : मा.सदस्य श्री.कवाडे यांनी विचारल्यानुसार डिमांड आणि सप्लायसंबंधी मी जे वर्णन केले ते खरे आहे. विद्यार्थी कोणते कॉलेज निवडतात हे त्यांच्यावर अवलंबून आहे. सिडनॅहम कॉलेज आणि जयहिंद कॉलेज जवळजवळ आहेत. दोन्ही ठिकाणी इनफ्रास्ट्रक्चर आहे. परंतु विद्यार्थी सिडनॅहम कॉलेज प्रिफर करतात. तसेच लोकेशन बघून सुध्दा प्रवेश घेतात. ठाणे जिल्हयातील विद्यार्थी असेल तर तो मुंबईच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेणे पसंत करतो. अनेक प्रकारच्या बाबी यामध्ये आहेत. मा.सदस्य डॉ. हिराणी यांनी प्रश्न विचारला होता की, पूर्वलक्षी प्रभावाने वाढीव फी वसूल केली जात आहे त्याला शासनाची परवानगी आहे काय ? यासंबंधात सुध्दा मा.मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा होणार आहे. शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधी यांच्या बरोबर मा.मुख्यमंत्र्यांची बैठक होणार असून यासंदर्भात जेवढे प्रश्न प्रलंबित आहेत त्यासंबंधी या बैठकीत निर्णय घेतला जाणार आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मराठवाडयामध्ये जवळजवळ 1540 विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी एकूण स्टाफ किती आहे ? तसेच पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर किती पैसा लागेल हे निश्चित करुन फी ठरविली आहे. परंतु तेवढा स्टाफ नसल्यामुळे अेआयसीटीई ने जागा कमी केल्या. गेल्या वर्षी पुरेसा स्टाफ दाखवून 40-45 हजार रु. फी घेऊन विद्यार्थ्यांची लूट केलेली आहे. सहा ते साडेसहा कोटी रु. फी वसूल केली आहे. विद्यार्थ्यांची ही फसवणूक झालेली आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की पुढील दोन वर्षांची फी शासन माफ

.....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 3 पुढे सुरु....

श्री. श्रीकांत जोशी...

करणार आहे काय ? फी निश्चित करुन घेतली आणि ती वसूल केली. तेवढया जागा अेआयसीटीई ने देणे आवश्यक होते. माझा प्रश्न असा आहे की, पुढील दोन वर्षे विद्यार्थ्यांना फुकट शिकविले जावे असे बंधन शासन या महाविद्यालयांवर टाकणार आहे काय ? तसेच फी वसूलीसंबंधी प्रत्येक संस्थानिहाय आकडेवारी शासन देणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, ए.आय.सी.टी.ई.ने मान्यता दिल्यानंतर एखाद्या संस्थेने स्टाफिंग पॅटर्नमध्ये किंवा इनफ्रास्ट्रक्चरमध्ये काही चेंज केलेला आहे असे दिसून आले तर जरुर त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.श्रीकांत जोशी : अनेक कॉलेजेसच्या बाबतीत तसे घडलेले आहे

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांना जनरल स्वरुपाचा प्रश्न विचारता येणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,ज्या वेळी शासन एखाद्या कॉलेजला परवानगी देते त्यावेळी शासन आणि त्या कॉलेजचे संस्था चालक यांच्या जाईन्ट अकाऊन्टमध्ये 40 लाख रुपये ठेवावयाचे अशी अट त्यावेळी घालण्यात आली होती.मुलभूत सुविधा पूर्ण केल्याशिवाय ही रक्कम त्यांना विथ ड्रॉ करता येणार नाही अशी अट प्रामुख्याने त्या वेळी घालण्यात आली होती असे असतांनासुध्दा ही अट शिथिल करुन शासनाने अनेक कॉलेजेसना हे पैसे परत दिले आहेत ही गोष्ट खरी आहे काय ? अशा प्रकारे ही अट शिथिल करुन ज्या संस्था चालकांना पैसे परत करण्यात आलेले आहेत त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : नवीन इजिनिरींग कॉलेजेस किंवा पॉलिटेक्नीक काढत असतांना शासनाचे काम फक्त ए.आय.सी.टी.ई.कडे रिकमन्डेशन करणे एवढेच असते. या संस्थांना ए.आय.सी.टी.ई.कडून परवानगी दिली जाते.महाराष्ट्र शासन फक्त रिकमन्डेशन करीत असते.

सभापती : या विषयाच्या बाबतीत माझ्या मनात जी शंका आहे ती शंका मी या निमित्ताने सभागृहापुढे मांडत आहे. कै. वसंतदादा पाटील यांनी 1984 साली एक ऐतिहासिक निर्णय घेतला होता आणि सुशिक्षित विद्यार्थ्यांना नवे दालन खुले करुन दिले होते. विशेषत: इंजिनिअरीग आणि मेडिकल तसेच तंत्र शिक्षण देणा-या विना अनुदान तत्वावरील संस्था सुरु करुन त्यांनी विद्यार्थ्यांना एक नवे दालन उघडून दिले होते.आज अशी चर्चा सुरु आहे की, मराठवाडयात 1700 ते 1800 इंजिनिअरीगच्या सीटस रिक्त आहेत किंवा त्या रद्द केल्या आहेत.राज्यातील इतर विद्यार्थी आज असा प्रश्न विचारत आहेत की, या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सी.ई.टी.च्या परीक्षेची अट टाकण्यात आलेली आहे.ती अट का रद्द केली जात नाही ? इंजिनिअरीग कॉलेजमधील विद्यार्थी अशी विनंती करीत आहेत की, एका बाजूला सी.ई.टी.च्या परीक्षेची अट टाकण्यात आलेली आहे आणि दुस-या बाजूला बारावीच्या मार्काची अट टाकण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता या मार्काचा त्या प्रवेशाशी फारसा काही संबंध नाही.परंतु महाराष्ट्र राज्यात अशी अट घालण्यात आली

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती ....

आहे की, त्या विद्यार्थ्याला बारावीच्या परीक्षेमध्ये 50 टक्के मार्क्स पडले पाहिजेत.तेव्हा ही अट शिथिल करण्यात येणार आहे काय ? 40 किवा 45 टक्के मार्क्स मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे काय ? या विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी प्रवेश देऊन ज्या रिक्त जागा आहेत त्या रिक्त जागा भरण्याचा प्रयत्न महाराष्ट्रामध्ये करण्यात येईल काय ? हा प्रयत्न करण्यात यावा अशी माझी भावना आहे. तेव्हा त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांचे जे काही मत असेल ते त्यांनी सांगावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या ठिकाणी आपण सी.ई.टी.च्या परीक्षेचा उल्लेख केलेला आहे त्याबाबत मी आपणास सांगू इच्छितो की ,या वर्षी इंजिनिअरींगसाठी सी.ई.टी.ची परीक्षा घ्यावयाची नाही असा निर्णय घेतला होता परंतु कोर्टाने असे सांगितले की, या वर्षी सी.ई.टी.ची परीक्षा घेण्यात यावी. आम्ही फक्त मेडिकलच्या प्रवेशासाठीच सी.ई.टी.ची परीक्षा घेणार होतो.इंजिनिअरींगच्या गेल्या वर्षी सात हजार सीटस रिकाम्या राहिल्या होत्या म्हणून सी.ई.टी.च्या परीक्षे ऐवजी बारावीचे मार्क्स पाहूनच या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार होता. परंतु कोर्टाच्या आदेशाप्रमाणे या वर्षी इंजिनिअरीगसाठी सुध्दा सी.ई.टी.ची परीक्षा घ्यावी लागली आहे.पुढच्या वर्षी इजिनिअरीसाठी सी.ई.टी.ची परीक्षा न घेण्याच्या बाबतीत आम्ही प्रयत्न करु.इंजिनिअरींगच्या प्रवेशासाठी बारावीमध्ये 50 टक्के मार्क्स पाहिजेत असे आपण निश्चित केलेले आहे.त्यावर चर्चा झ ाली आहे. तेव्हा पुढच्या शैक्षणिक वर्षात त्यावर निर्णय होईल.

सभापती : माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, इतर राज्यातील विद्यार्थ्यांना या बाबतीत काही सवलती दिल्या जातात. कर्नाटक राज्यामध्ये किंवा अन्य राज्यामध्ये तंत्र शिक्षण विभागाने एक परिपत्रक काढले आहे की, या विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेत जरी 45 टक्के मार्क्स पडलले असले तरी तो विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतो. आपल्याकडे मात्र बारावीच्या परीक्षेमध्ये त्या विद्यार्थ्याला 50 टक्के मार्क्स असले पाहिजे अशी अट आहे. तेव्हा आज तीन वाजता होणा-या बैठकीमध्ये या संदर्भात फेर विचार केला जाणार आहे काय ? आणि येथील विद्यार्थ्यांना न्याय दिला जाणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आज माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर तीन वाजता जी बैठक होणार आहे त्या बैठकीमध्ये खाजगी सस्थांच्या असोसिएशनचे अध्यक्ष आणि संस्था चालक येणार

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी .....

असून त्या बैठकीमध्ये फी सबंधीची चर्चा केली जाणार आहे. आपण जे सांगितलेले आहे ते सुध्दा नक्कीच लक्षात घेतले जाईल आणि त्यावर चर्चा केली जाईल. तसेच यासंदर्भात जो काही निर्णय घेतला जाईल तो आपणास कळविण्यात येईल.

नंतर श्री.जागडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नाशिक येथील ब्लिज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत उत्पादित केलेल्या सलाईन बाटलीमध्ये बुरशी आढळून येणे.

मु.शी. : नाशिक येथील ब्लिज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत उत्पादित केलेल्या सलाईन बाटलीमध्ये बुरशी आढळून येणे या संबंधी सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, सागर मेघे, वसंत पवार वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व औषधी प्रशासन मंत्र्यांचे लक्षवेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

नाशिक येथील ल्बिज इन्फ्यूसियन सर्जिकल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत केवळ ७ महिन्यांपूर्वी उत्पादित केलेल्या ५०० मि.ली. च्या डीएनएस सीलबंद सलाईन बाटलीमध्ये मोठ्या प्रमाणावर काळ्या रंगाची बुरशी आढळून आल्याची खामगांव, जि.बुलढाणा येथे उघडकीस आलेली घटना, सलाईनची ही बाटली नोव्हेंबर, २००४ मध्ये उत्पादित झाली असून ऑक्टोबर, २००७ मध्ये ती बाजारातून बाद होणे अपेक्षित असतांनाही मुदतीपूर्वीच मोठ्या प्रमाणावर बुरशी असलेल्या या सलाईनच्या बाटल्या खामगांवच्या बाजारात विकल्या जाणे, या सलाईनचा बॅच क्र.८८७ असून केवळ ७ महिन्यापूर्वीच उत्पादित झालेल्या डीएनएस सलाईनमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर बुरशी तयार होणे म्हणजेच कंपनीच्या उत्पादनाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यासारखे असल्यामुळे या सर्व उत्पादनाची तातडीने चौकशी होण्याबाबत शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता. नाशिक शहरात २००६ पर्यंत मुदत असलेल्या नेस्टर , नेस्फॉल, डयूपेस्टिन, मेरिडस, कॉल्ट्रॉस, विक्कोस्टर, इत्यादी औषधे कचराकुंडीत फेकून दिल्याचे अलिकडेच आढळणे. परिणामी स्थानिक रहिवाश्यात संबंधितांबाबत निर्माण झालेली चीड संतापाची भावना, याबाबत करावयाची कारवाई , उपाययोजना व शासनाची भूमिका.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी (अन्न व प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मे महिन्यात खामगाव शहरात ब्लिज इनफ्युजन ॲण्ड सर्जिकल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने उत्पादीत केलेल्या 500 मि.लि. सलाईनच्या बाटलीमध्ये काळ्या रंगाची बुरशी आढळली. मी माझ्या लक्षवेधी सूचनेमध्ये बॅच क्र. 887 चा उल्लेख केलेला आहे. परंतु माननीय मंत्रिमहोदयानी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात बॅच क्र. 987 चा उल्लेख केला आहे. मा. मंत्रिमहोदयांनी निवेदनात सांगितल्याप्रमाणे बॅच क्र. 987 मध्ये असा कोणताही साठा आढळून आला नाही. सलाईनचे उत्पादन करणारी ही नाशिकची कंपनी आहे. या कंपनीच्या माध्यमातून ज्या सलाईनचे उत्पादन होते, त्याचा वापर संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे. तसेच या सलाईनची एक्सपायरी डेट 2007 अशी आहे. उत्पादित केलेल्या सलाईनमध्ये पाच महिन्यातच बुरशी आढळून आली आहे. रुग्णांच्या जीवनाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. ही औषधी कंपनी जर अशा प्रकारच्या निकृष्ठ दर्जाचे उत्पादन करणार असेल आणि रुग्णांच्या जीवनाशी खेळणार असेल तर ते योग्य नाही. या बाबत माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदनात असे म्हटले आहे की, या मालाबाबत अजून कोणाचीही तक्रार आलेली नाही. वर्तमानपत्रात या बाबतची बातमी आली आहे. वर्तमानपत्राच्या बातमीच्या आधारावर अन्न व औषधे प्रशासनाच्या दक्षता पथकाने ताबडतोबीने धाड घालण्याची आवश्यकता होती. सभापती महोदय, निवेदनात असेही म्हटले आहे की, " या कंपनीच्या एकूण औषध उत्पादनाच्या संदर्भात उत्पादन विभागात अस्वच्छता असणे, अद्ययावत व योग्य अभिलेख न ठेवणे, चाचणी न करता चाचणी केल्याचे खोटे अभिलेख ठेवणे, विना लेबल व योग्य चाचणी न करता कच्चा माल साठवणे तसेच त्याचा इंजेक्शनच्या उत्पादनासाठी वापर करणे इत्यादी त्रुटी आढळून आल्या आहेत. या बाबत उत्पादन घटकास त्यांचे परवाने निलंबित का करु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. " आता या कंपनीने या कारणे दाखवा नोटीसस उत्तर दिले आहे काय ? उत्तर दिले असेल तर ते काय दिले आहे ? अशा प्रकारच्या औषधांचे उत्पादन जर ही कंपनी करणार असेल तर या कंपनीविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? या कंपनीचा परवाना शासन रद्द करणार आहे काय ?

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, दिनांक 8 मई 2005 के "लोकमत" के अंक में समाचार आया था कि ब्लिज इनफ्युजन एन्ड सर्जिकल प्रायव्हेट लिमिटेड कम्पनी के बॅच नं. 987 की 500 एम.एल. की बॉटल खामगांव शहर में पकड़ी गई हैं. 9 मई 2005 को ही ड्रग इन्सपेक्टर ने जनरल हॉस्पीटल बुलढाणा में जाकर जांच की और 10 मई को जितनी भी दवाइयों की फर्म थीं, आशीर्वाद मेडीकल, जनता मेडीकल, गजेन्द्र मेडीकल, जैन मेडीकल, पवन मेडीकल, न्यू अरेबियन मेडीकल इत्यादि के साथ साथ प्रायमरी हॅल्थ सेंटर और गवर्नमेंट डिस्ट्रिक हॉस्पीटल की जांच की गई और बॅच नं. 887 की बॉटल्स में कोई भी फंगस जैसी चीज नहीं पायी गयी. लोकमत पेपर में यह समाचार आया था और पेपर में आई हुई बात हमेशा सच होती है, ऐसा नहीं है. मैं बॅच नं.887 की बात कर रहा हूँ. "लोकमत" में बॅच नं. 987 का उल्लेख किया गया था.

श्री. पांडुरंग फुंडकर : बॅच नं. पेपर में गलत हो सकता है.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, लक्षवेधी सूचना के उत्तर में दिया गया है कि बॅच नं. 987 का स्टॉक प्राप्त नहीं हुआ है. 15.07.2004 को 500 एम.एल. की 1488 बॉटल्स बनाई गई थीं. यह पूरा स्टॉक डिस्ट्रीब्यूट हो गया है और बिक गया है. हमारा डिपार्टमेंट हमेशा जांच करता रहता है. इसके बाद हमने नाशिक के इन्सपेक्टर से कहा, वहां पर कम्पनी का उत्पादन होता है, इन्सपेक्टर ने वहां पर जांच की तो जो कमियां पाई गई, उसके बारे में 5 तारीख को कारण बताओ नोटिस दिया गया है और 13 तारीख तक इस नोटिस का जबाब आएगा. उसके बाद इस बारे में निर्णय लिया जाएगा.

श्री. पांडुरंग फुंडकर : मंत्रिमहोदयांनी 5 तारखेला नोटीस दिल्याचे सांगितले. परंतु हे प्रकरण मे महिन्यामध्ये घडले. मी प्रत्यक्ष ती बाटली बघितली आहे, आपण त्या दुकानाचे नाव सांगितले आहे....

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मा. विरोधी पक्ष नेता ने अगर वह बॉटल देखी हो तो मेहरबानी करके सदन में वह बॉटल आप मुझे दे दीजिए, हम तुरन्त कार्रवाई करेंगे.

श्री. पांडुरंग फुंडकर : बॉटल मैं सभापती महोदय के पास दूंगा, लेकिन मेरा सवाल यह है कि मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी 5 तारखेला शोकॉज नोटीस दिल्याचे सांगितले. परंतु ही लक्षवेधी सूचना लागल्यानंतर कंपनीला शोकॉज नोटीस दिली आहे. इतकी अनियमितता या कंपनीमध्ये चालू आहे. आपण मान्य केले आहे की, चाचणी न करता कच्चा माल वापरला जात आहे. अशाप्रकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

गंभीर बाब असतांना आपण शोकॉज नोटीस आता दिली. या पूर्वी आपल्या इन्सपेक्टरच्या लक्षात आले नाही कां?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मैं इस बारे में पहले ही बता चुका हूँ कि 8 तारीख को यह बात पेपर में आई और 9 तारीख से ही डिपार्टमेंट ने खामगांव में जांच शुरु कर दी, 10 तारीख को कई मेडीकल फर्म की जांच की और 15 तारीख को हमारे डिपार्टमेंट के लोग नाशिक गए और जाइंट कमिश्नर ने एक महीने के अन्दर कारण बताओ नोटिस दिया है. पक्की जानकारी लेने के बाद कारण बताओं नोटिस दिया जाना चाहिए. कोई व्यक्ति अगर दोषी पाया गया तो नोटिस में लॅप्स नहीं होने चाहिए. इस प्रकार से एक महीने के अन्दर शासन की तरफ से कार्यवाही की गई है.

(सभापती स्थानी मा. उपसभापती श्री. वसंत डावखरे)

श्री. पांडुरंग फुंडकर : आपण त्या कंपनीला शोकॉज नोटीस दिली, त्यामध्ये त्या कंपनीवर आरोप केले आहेत. आपण जी अनियमितता दाखविली आहे, जी इन्सपेक्टरच्या निदर्शनास आली आहे. त्या अनियमिततेत सत्यता आढळली तर त्या कंपनीचा परवाना आपण रद्द करणार काय?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह हायपोथेटिकल क्वश्चन है. जब कम्पनी की तरफ से उत्तर आएगा, उसके बाद क्वेसी ज्युडिसियल अथॉरिटी के हिसाब से कानून के अनुसार जो निर्णय होगा, वह किया जाएगा.

डॉ. एन. पी. हिराणी : सभापती महोदय, नियमबाहय औषधे पेशंटना विकण्याचा हा प्रकार निश्चितपणे गंभीर आहे. सरळ सरळ पेशंटच्या आयुष्याशी खेळ सुरु आहे. मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी उत्तर देतांना सांगितले की, या प्रकरणाची तपासणी करण्याबाबत जी नोटीस दिली आहे, त्या नोटीशीप्रमाणे लवकरच त्यांच्यावर कारवाई केली जाईल. या लक्षवेधी सूचनेचा दुसरा भाग असा की, नेस्टर, नेस्फॉल, डयूपेस्टिन, मेरिडस, कॉल्ट्रॉस, विक्कोस्टर इत्यादी औषधांच्या तपासणीची हालचाल सुरु झाल्यानंतर ती कचऱ्याच्या कुंडीत टाकली. याचा अर्थ असा की, ही सर्व औषधे मुदतबाहय होती. त्यांची तपासणी होईल म्हणून ती फेकण्यात आली. तपासणी झाल्यानंतर महापालिकेच्या दवाखान्यातून, हॉस्पिटलमधून ती औषधे फेकण्यात आली. परंतु ती औषधे विकणारी

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखाची नाही

डॉ. एन. पी. हिराणी...

जी कंपनी आहे, तिच्यावर गुन्हा रजिस्टर झाला काय? त्या कंपनीने ही मुदतबाहय औषधे विकली कां? अशाप्रकारची मुदतबाहय औषधे कंपनीमधून विकली जातात कां? याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, इस लक्षवेधी सूचना में दो प्रश्न हैं और दोनों प्रश्न अलग अलग हैं. पहले प्रश्न का उत्तर मैं दे चुका हूँ. दूसरा प्रश्न नाशिक महानगरपालिका से संबंधित है. 1.7.2005 को नाशिक महानगरपालिका ने पंचनामा करके डॉ. सलीम को सस्पेंड कर दिया है और उनका आगे इन्वेस्टीगेशन चालू है.

. . . .2 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी क्रमांक 1 बाबत

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांची पहिल्या क्रमांकावर लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेली आहे. मघाशी सदरहू लक्षवेधी सूचना पुकारण्यात आली, त्यावेळी सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते. आता ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

पृ.शी./मु.शी.: सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

उप सभापती : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :--

(1) श्रीमती सुधा जोशी

(2) श्रीमती मंदा म्हात्रे

(3) श्रीमती कांता नलावडे

(4) डॉ.नीलम गो-हे

. . . .2ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नाशिक येथील ब्लिज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत उत्पादित केलेल्या सलाईन बाटलीमध्ये बुरशी आढळून येणे.

मु.शी.: नाशिक येथील ब्लिज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत उत्पादित केलेल्या सलाईन बाटलीमध्ये बुरशी आढळून येणे या संबंधी सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, सागर मेघे, वसंत पवार वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(चर्चा पुढे सुरु)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.हिराणी साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याचे उत्तर आलेले नाही. या औषधांच्या संदर्भात बातमी प्रसिध्द झाल्यानंतर ही औषधे नाशिक शहरातील कचराकुंडीत फेकून देण्यात आली. या औषधांची एक्सपायरी डेट पुढच्या काळातील असताना देखील अशा प्रकारे ही औषधे फेकून दिली जातात, याचा अर्थ ती औषधे सदोष होती. तेव्हा यासंदर्भात गुन्हा रजिस्टर केला आहे का ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मैंने पहले ही बता दिया है कि नाशिक महानगरपालिका ने कार्रवाई की है. उन्होंने मेडिकल सुप्रीटेंड डॉ. सलीम को सस्पेंड किया है और आगे की कार्रवाई चल रही है

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यासदंर्भात मेडिकल सुप्रीटेंडला सस्पेंड करुन हा प्रश्न सुटणार नाही.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, चौकशी सुरु आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या औषधांचे उत्पादन करणा-या ज्या कंपन्या आहेत, त्यांच्यासंबंधी कारवाई करणार आहात का ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, ड्रग्स के बारे में कोई भी चीज गलत पाई जाएगी तो शासन उस कम्पनी पर कार्रवाई करेगा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी जेव्हा दोषी कंपनीच्या संदर्भात प्रश्न विचारला, तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी सांगितले

. . . .2ए-4

प्रा.जोगेंद्र कवाडे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, त्यांचा प्रश्न हा हायपोथेटीकल स्वरुपाचा आहे. पण त्यांनीच निवेदनामध्ये नमूद केलेले आहे की, "उपरोक्त कंपनीच्या एकूण औषध उत्पादनाच्या संदर्भात उत्पादन विभागात अस्वच्छता असणे, अद्ययावत व योग्य अभिलेख न ठेवणे, चाचणी न करता चाचणी केल्याचे खोटे अभिलेख ठेवणे, विना लेबल व योग्य चाचणी न करता कच्चा माल साठवणे तसेच त्याचा इंजेक्शनच्या उत्पादना साठी वापर करणे इत्यादी त्रुटी आढळून आल्या आहेत." अशा प्रकारे जेव्हा आपण आपल्या निवेदनामध्ये उल्लेख केलेला आहे, तेव्हा माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी विचारलेला प्रश्न हायपोथेटीकल कसा होऊ शकतो ? एवढया सर्व त्रुटी औषध निर्माण करणा-या उपक्रमांमध्ये आहेत. त्या उपक्रमांना आपण कोणत्या प्रकारे दंडित करणार आहात ? त्यांचे लायसन्स रद्द करणार आहात का ? तसेच दुसरी काही कायदेशीर कारवाई करणार आहात का ? जेणेकरुन दुस-या औषध कंपन्यांनी सर्वसामान्य जनतेच्या जीवनाशी खेळ करु नये, यासाठी प्रयत्न करणार आहात का ? निवेदनामध्ये शेवटी म्हटलेले आहे की, "नाशिक महानगरपालिकेच्या अखत्यारितील रुग्णालयात नेस्टर, नेस्फॉल, डयुपेस्टिन, मेरिडस, कॉल्ट्रास, विक्कोस्टर, ही औषधे कचराकुंडीत फेकून दिल्याचे प्रकरणी नाशिक महानगरपालिकेमार्फत कार्यवाही चालू आहे." मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, मेडिकल सुप्रीटेंडला निलंबित केले आहे. पण ही औषधे सदोष आहेत. पण ही औषधे ज्या कंपन्यांकडून विकत घेतली आहेत, त्या कंपन्यांच्या बाबतीत काय कारवाई करणार आहात ? त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करणार आहात का ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मेरा हायपोथेटिकल क्वश्चन कहने का मतलब यह था कि कम्पनी को कारण बताओ नोटिस दिया गया है और उसको उत्तर देने के लिए 7 दिन का समय दिया जाता है. आज की तारीख में मैं उसको क्या सजा दूंगा, यह बोलना मेरे लिए ठीक नहीं है. इस बारे में क्वेसी ज्युडिसियल अथॉरिटी निर्णय लेती है. जब कम्पनी की तरफ से उत्तर आएगा, तब कानून के हिसाब से जो भी तरतूद होगी, उसके अनुसार कड़ी से कड़ी कार्रवाई की जाएगी. नाशिक महानगरपालिका के मामले में अगर दवाओं में कोई भी चीज हानिकारक पाई जाएगी तो कानून के हिसाब से जो सख्त से सख्त तरतूद होगी, उसके अनुसार शासन कार्रवाई करेगा.

सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत प्रत/अशुद्धीत माही

श्री.पांडुरंग फुंडकर : नाशिक महानगरपालिकेच्या अखत्यारितील रुणालयात लागणारी औषधे फेकली गेली, त्या औषधांचा पंचनामा करून ती जप्त केलेली आहेत काय ?

श्री.बाबा सिध्दीकी : बद्रकाली पोलीस स्टेशनने त्याचा पंचनामा केलेला आहे.

डॉ.एन.पी.हिराणी : फेकून दिलेल्या औषधाच्या संबंधात मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले ते समाधानकारक मिळालेले नाही. ती फेकून दिलेली औषधे कोणत्या कंपनीची होती, याची चौकशी करण्यात आली आहे काय ? ज्या कंपनीने ही औषधे मॅन्युफॅक्चर केली त्यांना शो-कॉज नोटीस देण्यात आली आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, इस प्रकरण के बारे में नाशिक महानगरपालिका चौकशी कर रही है. नेस्टर, नेस्फॉल, ड्युपेस्टिन, मेरिडस, कॉल्ट्रास, विक्कोस्टर इत्यादि जो दवाइयां फेंकी गई हैं, इस बारे में चौकशी कर रहे हैं और चौकशी पूरी होने के बाद दोषी कम्पनियों के खिलाफ कार्रवाई की जाएगी. कम्पनी और उसके मालिकों के नाम अभी मेरे पास नहीं है. मैं यह जानकारी सभागृह के पटल पर रख दूंगा.

तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे) : मंत्री महोदय, खरे तर ही गंभीर बाब आहे. सन्माननीय सदस्यांनी कचरा कुंडीमध्ये औषधे फेकून दिल्याच्या संबंधाने विचारले. ही कोणत्या कंपनीची औषधे आहेत, याची त्वरित चौकशी करून त्या कंपनींवर कडक कारवाई करण्याबाबत शो-कॉज नोटीस दिली पाहिजे.

श्री.बाबा सिध्दीकी : ठीक आहे.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/

विशेष उल्लेख

पृशी. : राज्यातील अवर्षणग्रस्त परिस्थितीमुळे कृत्रिम पाऊस पाडण्याची आवश्यकता व बोगस बी.टी.बियाणांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत.

मु.शी. : राज्यातील अवर्षणग्रस्त परिस्थितीमुळे कृत्रिम पाऊस पाडण्याची आवश्यकता व बोगस बी.टी.बियाणांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत याबाबत श्री. संजय दत्त,वि.प.स.यां-ी दिलेली विशेष उल्लेजाची सूच-ा.

तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे) : मा-ा-ीय सदस्य श्री.संजय दत्त,वि.प.स. यां-ी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा मांडतो.

"जुलै महिना अर्धा संपत आला असताना अजूनही राज्यात विदर्भ व मराठवाड्यात बहुतांशी जिल्ह्यांमध्ये पाऊस पडलेला नाही तर बऱ्याच ठिकाणी पुरेसा पाऊस झालेला नाही. त्यामुळे या अवर्षणग्रस्त भागातील शेतकरी चिंतातूर असून शासनाकडे व आकाशाकडे डोळे लावून बसलेला आहे. गतवर्षी पश्चिम महाराष्ट्रातील बऱ्याच ठिकाणी पावसाने अशीच दडी मारली असता त्या ठिकाणी कृत्रिम पाऊस पाडण्याचा शासनाने प्रामाणिक प्रयत्न केला. त्यात सरकार बऱ्याच अंशी यशस्वी झाले व कृत्रिम पाऊस पडलेला विभाग भीषण दुष्काळापासून वाचला. सद्य:स्थितीत जुलै महिना अर्धा संपला असतानाही व महत्वाच्या पिकांची पेरणी करण्याची वेळ संपत आली असतांनाही अजूनपावेतो या जिल्ह्यांमध्ये पाऊस नाही. म्हणून शासनास मी या निवेदनातर्फे नम्र विनंती करीत आहे की, पाऊस पडलेला नाही त्या ठिकाणी त्वरित कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यान्वित करावी व पाऊस पाडण्यासाठी योग्य परिस्थिती निर्माण झाल्यावर त्या ठिकाणी कृत्रिम पाऊस पाडावा, जेणेकरुन भविष्यात उद्भवणाऱ्या अनेक समस्यांपासून त्या ठिकाणचा शेतकरी वाचू शकेल. तसेच राज्यात बऱ्याच ठिकाणी बोगस बियाणे विक्री झाली आहे, असे वर्तमान पत्रात आलेल्या बातम्यांवरून समजते. शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळणाऱ्या या नराधमांचा शोध घेऊन त्यांना कठोर शिक्षा व्हावी व ज्या शेतकऱ्यांनी ही बोगस बियाणे खरेदी करून ज्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना नुकसानभरपाई देण्याचे आदेश शासनाने तातडीने द्यावेत, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या निवेदनामार्फत शासनास करीत आहे".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/

पृशी. : अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील भोनंग खाडीला संरक्षक बंधारा नसल्यानेसमुद्राचे पाणी परिसरातील हजारो एकर शेतीत घुसून जमीन नापीक होण्याचा संभव.

मु.शी. : अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील भोनंग खाडीला संरक्षक बंधारा नसल्यानेसमुद्राचे पाणी परिसरातील हजारो एकर शेतीत घुसून जमीन नापीक होण्याचा संभव याबाबत, श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे) : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) रेवदंडा येथील फणसापूर ते भोनंग रस्त्या लगत असलेल्या भोनंग खाडीला संरक्षक बंधाराच नसल्याने या भागात पाणी शिरून आसपासच्या परिसरातील हजारो एकर शेती नापीक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भोनंग खाडीच्या संरक्षक बंधाऱ्यापासून रामराज नदीचा प्रवाह 50 मीटर अंतरावर आहे. पर्जन्यवृष्टीमुळे व उधाणाच्या भरतीच्या पाण्यामुळे खाडीकडील भागाची मोठया प्रमाणात धूप झाली. त्यामुळे नदीचे पात्र पूर्वीपेक्षा मोठे झाले आहे.

ही बाब ग्राम संस्थांनी पेण व अलिबागच्या खारभूमी योजना अन्वेषण विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या लक्षात आणून दिली होती. याची दखल घेऊन 1990 मध्ये या विभागाने खारभूमीच्या संरक्षणासाठी दगडी टाकल्या होत्या.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

मात्र त्यानंतर या समस्येकडे संबंधित खात्याकडून दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे या सहा गावांतील गावक-यांनी पुढकार घेऊन या बंधा-याची तात्पुरती डागडुजी केली. रेतीने भरलेली पोती भरुन बंधारा बांधून काढला. परंतु ही उपाययोजना तात्पुरती आहे. पावसाच्या व भरतीच्या पाण्याच्या मा-यापुढे हा बंधारा तग धरु शकणार नाही, अशी भिती गावकरी व्यक्त करीत आहेत. संरक्षक बंधा-याचे काम न झाल्यास हजारो एकर भातशेती नष्ट होऊन संबधित गावांना धोका निर्माण झाला आहे. तरी शासनाचे या प्रकरणी लक्ष वेधण्यासाठी हा विशेष उल्लेख मी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृशी. : "कोकणातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता कणकवली येथील नरडवे मध्यम प्रकल्पांतर्गत पूर्वी मंजूर केलेल्या कालव्यांचा सदर प्रकल्पात पुन्हा समावेश करणेबाबत."

मु.शी. : "कोकणातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता कणकवली येथील नरडवे मध्यम प्रकल्पांतर्गत पूर्वी मंजूर केलेल्या कालव्यांचा सदर प्रकल्पात पुन्हा समावेश करणेबाबत." कर्नल सुधीर सावंत वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे) : माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : महोदय,कणकवली तालुक्यातील नरडवे प्रकल्प मंजूर करण्यात आला आणि त्यानंतर निविदा काढतेवेळी तो मापदंडात बसविण्यासाठी त्याचा कालवा रद्द करण्यात आला. कोकणात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयातील डोंगराळ भागात सिंचन व्यवस्था करण्याच्या योजनेंतर्गत कोल्हापूर टाईप बंधारे बांधून, के.टी. वेअर बांधून व लिफ्ट इरिगेशन करुन सिंचन व्यवस्था होऊ शकत नाही. आज तेथील काम सुरु होऊन, अनेक वर्षे झाल्यानंतर सुध्दा कमांड एरिया निर्धारित करण्यात आलेला नाही. त्यामुळे तेथील पुनर्वसनाचे काम होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत त्याठिकाणी शासनाचे लाखो रुपये खर्च करण्यात येत आहेत. पण निश्चितपणे कमांड एरिया निर्धारित करण्यात आलेला नाही. म्हणून या विषयाची चौकशी होणे गरजेचे आहे. "कमांड एरिया" निर्धारित न करता निविदा कशा काढण्यात आल्यात, याची चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच तात्काळ "कमांड एरिया" निर्धारित करुन, पुन्हा कालवा मंजूर करण्याची आवश्यकता आहे. आता कालव्याचे मापदंड बदललेले आहेत. पीक पध्दती बदललेली आहे. पूर्वी भात क्षेत्रावरुन "कॉस्ट बेनिफिट रेशियो" ठरविला जात होता. आता फळ बागायती क्षेत्रावरुन सुध्दा "कॉस्ट बेनिफिट रेशियो" ठरविता येतो. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन, या मध्यम प्रकल्पांतर्गत पूर्वी मंजूर केलेल्या कालव्यांना पुन्हा मंजुरी देण्यात यावी, तसेच "कमांड एरिया" निर्धारित करण्यात यावा अशा प्रकारची मी शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:सभागृहाच्या कामकाजा संबंधी.

तालिका सभापती :यानंतर आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर बाब क्रमांक आठ वर सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 16- विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2005 दाखविण्यात आलेले आहे. सदरहु विधेयकावर उद्या चर्चा घेण्यात येईल. तसेच आजच्या कामकाजपत्रिकेवरील अर्धा-तासाच्या दोन्ही चर्चा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

सभागृहापुढील दिवसाचे कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 13 जुलै, 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 23 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 13 जुलै, 2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही